cmyk

## संपादकीय

### समाज आणि सरकार दोघेही असंवेदनशील

वसईत रहदारीच्या रस्त्यावर एका माथेफिरू प्रियकराने आपल्या प्रेयसीवर पोलादी पान्याने १५ ते १६ वार करून तिची निर्घृण हत्या केली. वसई पूर्वेच्या गावराईपाडा येथे सकाळी साडेआठ वाजता ही घटना घडली. त्यावेळी रस्त्यावर लोकांची वर्दळ सुरू होती. परंतु त्यापैकी कुणीही या घटनेतील हत्याऱ्यास रोखण्याचा प्रयत्न केला नाही. रस्त्यातून अनेकजण जात-येत होते मात्र, तरुणीची दिवसाढवळ्या हत्या होताना कोणीही मदतीस न धावल्याने मानवतेचीही हत्या झाली असेच म्हणावे लागेल.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-७३ | रविवार दि.२३ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


### परिक्षा पारदर्शकच एमएचटी-सीईटीचा खुलासा

मुंबईः व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया संगणकाधारित आणि केंद्रीय पद्धतीने राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. हीच पद्धत नंतर केंद्र सरकारने स्वीकारली आहे. ही पद्धत पूर्णपणे पारदर्शक आणि मानवी हस्तक्षेपरहीत आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी आज पत्रकार परिषदेत केले. मंत्रालयातील मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर कक्षात आज दुपारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आयुक्त दिलीप सरदेसाई बोलत होते.

# अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी भरीव तरतूद?

## अर्थमंत्री सितारामन यांना तज्ज्ञांच्या सूचना, शेतकरी मतांचा फटका बसल्याचा परिणाम

**नवी दिल्ली । वृतसंस्था**


नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीए ३.० सरकारचा पहिला पूर्ण अर्थसंकल्प जुलै महिन्यात सादर केला जाणार आहे. लोकसभा निवडणुकांपूर्वी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. त्यानंतर लोकसभा निवडणुक झाली. निवडणुकांमध्ये एनडीएने बाजी मारत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. अर्थमंत्री सितारामण जुलै महिन्यात या सरकारचा पहिला पूर्ण अर्थसंकल्प संसदेत सादर करणार आहेत. त्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ञ, अभ्यासक आणि घटकांच्या बैठकांचा सिलसिला सुरू झाला आहे. अर्थमंत्री सीतारामन यांनी शेतकरी संघटना आणि कृषी तज्ज ◀◀ पान २ वर



### धोरणांत बदल करण्याची सूचना

केंद्र सरकारची धोरणे कृषी निर्यातीला खोडा घालणारी आहेत. त्यात बदल करावेत, अशी शेतकरी मागणी करताहेत. पण त्यासोबत कृषी निर्यातीला चालना देण्याचीही गरज आहे. त्यामुळे अपेडासाठीची आर्थिक तरतूद ८१ कोटींवरून ४०० कोटीपर्यंत करावी, असेही मत या बैठकीत प्रतिनिधिंनी मांडले. तर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक निर्यात केंद्र उभारावे. तसेच एक हजार कोटींचे राष्ट्रीय शेळी आणि मेंढी मिशन सुरू करण्यात यावें, असे एमजे खान यांनी अर्थमंत्र्यांना सुचवले आहे.

### ३३ लाख ८३ हजार हेक्टरवर खरीपाची पेरणी; १६५ तालुक्यांत सरासरीएवढा पाऊस



**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात १ जूनपासून आतापर्यंत एकूण १४१ मिलिमीटर अर्थात सरासरीच्या ६८ टक्के पाऊस झाला असून, २५ जिल्ह्यांमधील १६५ तालुक्यांत पावसाने सरासरी ओलांडली आहे. त्यात प्रामुख्याने मराठवाडा, पश्चिम विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील तालुक्यांचा समावेश आहे. राज्यात ◀◀ पान २ वर

# ओबीसी आरक्षण अबाधितचा शब्द; लढा सुरुच राहणार

## राज्य सरकारच्या आश्वासनानंतर लक्ष्मण हाकेंचे उपोषण स्थगित



**जालना । प्रतिनिधी**

**मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण घेण्याच्या मागणीमुळे लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांनी वडीगोद्रीत उपोषण केल्यावर अखेर राज्य सरकारने ओबीसी आरक्षण अबाधित राहणार असल्याचा शब्द दिल्याने मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत हे उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र यापुढेही ओबीसींच्या हक्कासाठी लढा सुरु राहणार असल्याचे हाके यांनी जाहीर केले.**

छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ लक्ष्मण हाके यांच्या भेटीला गेले होते. त्यावेळी या शिष्टमंडळाने आरक्षणावर राज्य सरकारची काय भूमिका आहे याची माहिति हाके यांना दिली. त्याचवेळी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी आपले उपोषण मागे घ्यावे अशी विनंती या शिष्टमंडळाकडून करण्यात आली. राज्याचे मंत्री छगन भुजबळ बोलताना म्हणाले की, आमच्यावरचा अन्याय कधी संपणार? आता त्यांची दादागिरी चालणार नाही. आरक्षण हा गरिबी हटावचा कार्यक्रम नाही, अन्याय झालेले समाज हळूहळू पुढे यावेत यासाठी आरक्षण आहे. यावेळी धनंजय मुंडे, आ. गोपीचंद पडळकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. शिष्टमंडळाने राज्य सरकारच्या वतीने आंदोलनकर्त्यांना ओबीसी आरक्षणाला कसलाही धक्का लागणार नाही, असा शब्द दिल्यावर हे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात येत असून ओबीसींचा हा लढा यापुढेही सुरुच राहणार असल्याचे लक्ष्मण हाके यांनी यावेळी जाहीर केले.

### सरकार एकमेकांशी भांडण लावतय-ओवैसी

असदुद्दीन ओवैसी यांनी ट्विट करत प्रतिक्रिया दिली. आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्यात आली आहे. हे सरकार ओबीसी आणि मराठा यांच्यात भांडण लावत असल्याचे ओवैसी यांनी म्हटले आहे.

### हाकेंवर पुन्हा उपोषणाची वेळ आणू नका-पंकजा मुंडे

ओबीसींवर अन्याय होणार नाही, याची काळजी सरकारनेही घ्यावी. आज सरकारच्या आश्वासनामुळे लक्ष्मण हाके यांनी उपोषण सोडले आहे. मात्र सरकारने त्यांच्यावर पुन्हा उपोषण करण्याची वेळ आणू नये अशी प्रतिक्रिया भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

### » तर विधानसभा, लोकसभेतही आम्हाला आरक्षण हवे-छगन भुजब

आम्ही लोकसभेवर जायचे नाही, विधानसभेवर जायचे नाही. जर असेच सुरु राहिले तर विधानसभा आणि लोकसभेतही आम्हाला आरक्षण हवे, अशी मागणी करावी लागेल, असे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

### लक्ष्मण हाके यांच्या मागण्या

**१) ओबीसी भटक्या विमुक्त जाती जमातीच्या मूळ आरक्षणात मराठा समाजाचा समावेश करू नये. तसे लेखी आश्वासन मुख्यमंत्री महोदयाकडून मिळाले पाहिजे.**
**२) कुणबीच्या लाखो बोगस नोंदीची त्वरित दखल घेवून त्या रद्द करण्यात याव्यात.**
**३) ओबीसीच्या आर्थिक विकास महामंडळाना आर्थिक तरतूद व्हावी.**
**४) ओबीसीच्या वसतिगृहाची प्रत्येक जिल्हात योजना कार्यान्वित व्हावी.**
**५) ओबीसीची जातनिहाय जनगणना व्हावी.**

### » काय म्हणाले छगन भुजबळ?

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना पाडलं. पण लढाई आता संपली नाही. आम्ही कुणालाही घाबरत नाही. यापुढे तुम्ही सगळे एकत्र राहिला तर तुमचं आरक्षण टिकेल. हातावर हात ठेवून बसलात तर काही होणार नाही. यापुढे लोकशक्ती एकत्र आली तर धनशक्तीचा पराभव होणार. विधानसभा आणि लोकसभेत आरक्षण हवे. जातनिहाय जनगणनेला देवेंद्र फडणवीसांचा पाठिंबा आहे. काही जण ओबीसी प्रवर्गातून आणि १० टक्क्यातूनही आरक्षण घेतात. खोटे कुणबी दाखले देणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणार. ओबीसींना प्रमाणपत्र हवे असेल तर १० महिने थांबावे लागले. आपल्याला लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांच्या पाठीशी उभं राहिचे आहे. दलित आदिवासी समाज तुमच्यासोबत आहे. राज्यात अनेक ठिकाणी खोटे दाखले वाटले. ज्यांनी खोटे दाखले वाटले, त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. खोटे दाखले पुन्हा एकदा तपासले जाणार. खोटे दाखले देणाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार. पूर्वीचे जे नियम आहेत, ते सुप्रीम कोर्टाच्या नियमांनुसार आहेत.

### » काय म्हणाले लक्ष्मण हाके?

बोगस सर्टिफिकेट देणाऱ्यांवर आणि घेणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्य सरकारने आश्वासन दिले. त्यावर श्वेतपत्रिका काढावी आणि ते जाहीर करावे. या सरकारकडून न्यायाची अपेक्षा आहे. पंचायत राजच्या निवडणुका आता ओबीसी आरक्षण देऊन घेणार की त्याशिवाय घेणार हे शासनाने स्पष्ट करावे. अधिवेशन काळात सर्वपक्षीय बैठक होणार असून त्यामध्ये चर्चा होऊन निर्णय घेण्यात येईल. या सरकारने आश्वासन दिले आहे, पण केवळ त्यावर आम्ही विश्वास ठेवणार नाही. त्यामुळे आमच्या मागण्या पूर्णपणे मान्य होईपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे. आता ते फक्त तात्पुरतं स्थगित केले आहे.

### » मुख्यमंत्र्यांनी मानले लक्ष्मण हाकेंचे आभार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, समाजा-समाजात तेढ निर्माण होवू नये, यासाठी चर्चा करण्यात आली. मराठा आणि ओबीसी समाजात वाद होवू नये, यासाठी चर्चा झाली. अधिवेशनाच्या काळात काही मुद्द्यांवर चर्चा करण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. तसेच लक्ष्मण हाके यांचे उपोषण स्थगित केल्याबद्दल आभार मानले.

### राज्यसभेबाबत पंकजा मुंडेंचे एका वाक्यात उत्तर

मुंबई-पंकजा मुंडे यांच्या पराभवानंतर त्यांचे राजकीय पुनर्वसन केले जाण्याची शक्यता आहे. भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा मुंडे यांना राज्यसभेवर पाठवा अशी विनंती केंद्र सरकारकडे केल्याची सूत्रांची माहिती आहे. पंकजा मुंडे यांना आणि ओबीसी समाजाला प्रतिनिधीत्व देणे गरजेचे असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दरम्यान पंकजा ◀◀ पान २ वर

# एनटीएच्या परिक्षा पध्दतीत सुधारणा करण्याठी केंद्राकडून समिती

## इस्त्रोचे माजी प्रमुख डॉ. के. राधाकृष्णन करणार समितीचे नेतृत्व

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक असलेली नीट-यूजी परीक्षेतील गैरप्रकाराविरोधात देशभरातील रोष पाहायला मिळत आहे. यापाठोपाठ नेट परीक्षाही रद्द करण्याची नामुष्की सरकारवर ओढवली. यानंतर आता शिक्षण मंत्रालयाने देशातील स्पर्धात्मक परीक्षेतील सुधारणा करण्यासाठी एका समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या प्रमुखपदी माजी इस्त्रो प्रमुख डॉ. के. राधाकृष्णन असतील, अशी घोषणा शिक्षण मंत्रालयाने केली आहे.

केंद्र सरकारने म्हटले आहे की. परीक्षा प्रकिया सुधारणा संदर्भात स्थापन केलेली समिती दोन महिन्यांमध्ये आपला अहवाल सादर करणार आहे. स्पर्धात्मक ◀◀ पान २ वर

### » समितीमधील सदस्य

परीक्षा प्रक्रिया सुधारणा समितीच्या अध्यक्षपदी इस्रोचे माजी अध्यक्ष आणि आयआयटी कानपूरच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन असतील. इतर सदस्यांमध्ये डॉ. रणदीप गुलेरिया, एम्स दिल्लीचे माजी संचालक प्रा. बी जे राव, हैदराबाद केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. राममूर्ती के, आयआयटी मद्रासच्या सिव्हिल इंजिनीअरिंग विभागातील प्रोफेसर एमेरिटस, पंकज बन्सल, पीपल स्ट्राँगचे सह-संस्थापक आणि कर्मयोगी भारतचे बोर्ड सदस्य प्रा. आदित्य मित्तल, आयआयटी दिल्लीचे विद्यार्थी अधिष्ठाते गोविंद जयस्वाल, शिक्षण मंत्रालयाचे सहसचिव हे या समितीचे सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

# मराठे आधी कोणाच्या अंगावर जाणार नाहीत, पण..

## मनोज जरांगेंचा थेट इशारा कोणाला?

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

आम्हाला धक्का लागतोय. त्यांना काय धक्का लागतोय. आमचं आम्ही घेणार. आम्ही ओबीसीतील आरक्षण घेणार. राज्य सरकारमध्ये ओबीसी नेत्यांवर दबाव आहे. तेच आंदोलन करायला लावतात, सत्ताधारी ◀◀ पान २ वर



### » भुजबळांविरोधात मराठा क्रांती मोर्चा आक्रमक

पंढरपुर-मंत्रिमंडळातून छगन भुजबळ यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाचे धनाजी साखळकर यांनी केली असून मराठा क्रांती मोर्चा आता भुजबळांविरोधात आक्रमक होताना दिसत आहे.

### मग मी हात बांधून बसू का?

आमच्या ओरिजनल नोंदी आहेत. मराठ्यांना आरक्षण देऊ नये, ते खोट आहे, असे कसे म्हणता?. सत्तेत राहून आंदोलन उभी करतो. रस्त्यावर उतरायची भाषा करतो. हे रस्त्यावर उतरायची भाषा करतात, मग मी हात बांधून बसू का? भांडण लावत असेल, दंगली घडवत असेल, मराठ्यांचे मुडदे पडू देऊ का? माझा मराठ्यांच्या नेत्यांना सवाल आहे, असे जरांगे म्हणाले.

### जरांगेंची प्रकृती खालावली

मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली असून त्यांना संभाजीनगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यावेळी त्यांना सलाईन लावण्यात आली असून ईसीजी काढण्यात आला आहे. तर आणखी काही दिवस आराम करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३.५० क्विंटल | २,३५० | २,७१० | २,५३० |
| ज्वारी/हायब्रिड : ४४.०० क्विंटल | २,२४० | २,५५१ | २,३३७ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ४.५० क्विंटल | ७,००१ | ८,०६१ | ७,५३१ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ३९.५० क्विंटल | २,४०० | २,८०१ | २,६१० |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ६.०० क्विंटल | ४,४६१ | ४,४७१ | ४,४६६ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,२०१ | ६,५०० | ५,८५० |

# पेपरफुटी रोखण्यासाठी नवा कायदा

## मुख्य आरोपीला १ कोटी रूपयांपर्यंतचा दंड करणार, उशीराने का होईना केंद्र सरकारला आली जाग

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**मागील जवळपास पाच ते सात वर्षात केंद्रात सत्तेवर असलेल्या सरकारला विविध स्पर्धात्मक परिक्षांमध्ये पेपरफुटीच्या घटना उघडकीस येऊनही त्यावर पायबंद घालून लाखो-करोडो युवकांचे वाया जाणारे भविष्य रोखण्यासाठी कोणताही कायदा आणला नाही की, दोषींच्या विरोधात कठोर शिक्षेची तरतूद करता आली नाही. शेवटी विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढल्यानंतर आणि विरोधकांनी केंद्र सरकारच्या विरोधात ठोस भूमिका घेतल्यानंतर अखेर केंद्र सरकारला जाग आली आहे. केंद्रातील सरकारने या वाढत्या पेपरफुटीच्या घटनांना आळा घालण्यासाठी रातोरात अध्यादेश काढत नवा कायदा लागू केला.**

देशातील अनेक विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षांमधील पेपरफुटी आणि फसवणूक रोखण्यासाठी सार्वजनिक परीक्षा (अयोग्य माध्यमांना प्रतिबंध) कायदा, २०२४ लागू केला. नीट आणि युजीसी एनईटी (नेट) परीक्षांबाबत मोठ्या वादाच्या पार्श्वभूमीवर हा कायदा लागू करण्यात आला आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, रेल्वे, बँकिंग भरती परीक्षा आणि नॅशनल टेस्टिंग ◀◀ पान २ वर

### नवीन कायद्यातील तरतूदी

**कठोर शिक्षा** – कायद्याने परिक्षेचे पेपर लीक करणाऱ्या किंवा उत्तरपत्रिकांमध्ये छेडछाड करणाऱ्या व्यक्तींना किमान तीन वर्षांच्या तुरुंगवासाची, पाच वर्षांपर्यंत वाढवता येईल अशी तरतूद आहे. तसेच दोषींना १० लाख रुपयांपर्यंतचा दंडही भरावा लागणार आहे.

**अजामीनपात्र गुन्हे** – कायद्यांतर्गत सर्व गुन्ह्यांची दखलपात्र आणि अजामीनपात्र अशी वर्गवारी करण्यात आली आहे, म्हणजे अधिकारी वॉरंटशिवाय व्यक्तींना अटक करू शकतात आणि ते अधिकार म्हणून जामीन मागू शकत नाहीत.

**सेवा प्रदात्यांसाठी उत्तरदायित्व** – संभाव्य गुन्ह्याची माहिती असलेल्या परीक्षा सेवा प्रदात्यांना परंतु त्याची तक्रार न केल्यास त्यांना १ कोटी रुपयांचा दंड होऊ शकतो.

**संघटित गुन्ह्यांना लक्ष्य करणे** – संघटित फसवणुकीवर कायदा कठोर भूमिका घेतो. सेवा प्रदात्यांमधील वरिष्ठ अधिकारी जे जाणूनबुजून अशा गुन्ह्यामध्ये भाग घेतात किंवा त्यांची सोय करतात त्यांना किमान तीन वर्षांची शिक्षा, संभाव्यत: १० वर्षांपर्यंत वाढू शकते आणि १ कोटी रुपयांच्या दंडासह. परीक्षा अधिकारी किंवा सेवा प्रदाते संघटित परीक्षेतील गैरव्यवहारात गुंतलेल्यांना किमान ५ वर्षे आणि जास्तीत जास्त १० वर्षे तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांचा दंड होऊ शकतो.

**निर्दोषांसाठी संरक्षण** – हा कायदा अशा व्यक्तींना काही संरक्षण प्रदान करतो जे त्यांच्या नकळत गुन्हा केल्याचे सिद्ध करू शकतात आणि त्यांनी ते रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.

cmyk

## अग्रलेख

# समाज आणि सरकार दोघेही असंवेदनशील

वसईत रहदारीच्या रस्त्यावर एका माथेफिरू प्रियकराने आपल्या प्रेयसीवर पोलादी पान्याने १५ ते १६ वार करून तिची निर्घृण हत्या केली. वसई पूर्वच्या गावराईपाडा येथे सकाळी साडेआठ वाजता ही घटना घडली. त्यावेळी रस्त्यावर लोकांची वर्दळ सुरू होती. परंतु त्यापैकी कुणीही या घटनेतील हत्याऱ्यास रोखण्याचा प्रयत्न केला नाही. रस्त्यातून अनेकजण जात-येत होते मात्र, तरुणीची दिवसाढवळ्या हत्या होताना कोणीही मदतीस न धावल्याने मानवतेचीही हत्या झाली असेच म्हणावे लागेल. हत्येनंतर आरोपी घटनास्थळावरच बसून होता. त्याला पोलिसांनी अटक केली.

नालासोपारा येथे राहणारा रोहित यादव (२९) आणि आरती यादव (२२) या दोघांचे सहा वर्षांपासून प्रेमसंबंध होते. परंतु गत महिनाभरापासून त्यांच्यात ब्रेकअप झाला होता. आरती अन्य मुलाशी बोलत असल्याचा रोहित याला संशय होता. यावरून त्या दोघांमध्ये भांडणे होत होती. आरती वसईच्या एका कंपनीत कामाला होती. सकाळी साडेआठच्या सुमारास ती नेहमीप्रमाणे कामावर जाण्यासाठी निघाली होती. मात्र, गावराईपाडा येथील स्टेट बँकेसमोर रोहितने तिला अडवले. दोघांची शाब्दिक बाचाबाची झाली. त्यावेळी रोहितने आणलेल्या पोलादी पान्याने तिच्यावर सपासप वार केले. आरती खाली कोसळली. काही वेळाने रोहित पुन्हा आला आणि त्याने तिच्यावर पुन्हा वार केले. आरती गतप्राण झाल्यावर रोहित तिथेच बसून होता. आरतीचे बारावीपर्यंत शिक्षण झाले असून एका महिन्यापूर्वीच ती कामाला लागली होती. सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर गर्दी होती. आरोपी हा आरतीवर वार करत असताना लोक व्हीडीओ काढण्यात मग्न होते. कोणीही तिला वाचवायला पुढे आले नाही. फक्त एक तरुण आरोपीला अडवायला पुढे आला होता पण त्याचा प्रयत्न निष्फळ ठरला. त्यावेळी चार लोक पुढे आले असते तर आरतीचे प्राण वाचले असते. घटनेच्या दोन दिवस आधी रोहितने आरतीला मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली होती. तिने आचोळे पोलिसांत तक्रार दिली होती. मात्र, पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने न घेता रोहितला केवळ समज देऊन सोडून दिले होते. त्याचवेळी पोलिसांनी कठोर पावले उचलली असती तर आपल्या बहिणीचे प्राण वाचले असते अशी खंत आरतीच्या बहिणीने व्यक्त केली आहे. वसईतील भीषण घटना घडल्यानंतर प्रश्न पडतो की, समाजमन, समाजभान बिघडले आहे काय? वरचेवर समाज षंढ बनत चालला आहे काय? वसईत दिवसाढवळ्या इतका भयंकर प्रकार घडूनही सामाजिक किंवा राजकीय स्तरावर त्याचे कोणतेच तीव्र पडसाद उमटलेले दिसत नाहीत. एका प्रियकराने आपल्या प्रेयसीची वर्दळीच्या रस्त्यावर निर्घृण हत्या केली तेव्हा आजूबाजूने जाणारा जमाव निर्लज्जपणे हा सगळा प्रकार पाहत होता. पण कोणाचीही त्या तरुणाला रोखण्याची हिंमत झाली नाही. त्यावेळी चार लोक एकत्र आले असते तर हत्याऱ्याला रोखता आले असते. परंतु त्याऐवजी आपल्या मोबाईलमधून घटनेचे चित्रीकरण करणारे तरुण म्हणजे गुन्हेगारापुढे नांगी टाकणारे षंढच म्हटले पाहिजेत. यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत. परंतु केवळ भीतीपोटी लोक अशा घटनांमध्ये पडायला घाबरतात. स्वत:च्या जीवाबरोबरच त्यांना पोलिसांचा ससेमिरा टाळायचा असतो. अर्थात ही सारी कारणे मुर्दाडांची प्रवृत्ती दर्शविणारी ठरतात. जिथे कुत्र्या-मांजरासाठी जीव टाकणारे लोक पहायला मिळतात तिथे एका महिलेला वाचवण्यासाठी एकाही पुरुषाला पुढाकार घ्यावासा वाटला नाही. याचा अर्थ एकच, भेकडांच्या समाजात माणुसकीची हत्या. गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. गुन्हा करूनही आपण कायद्याच्या कचाट्यातून सहिसलामत बाहेर पडू शकतो अशी प्रवृत्ती बळावत चालली आहे. अनेक प्रकारचे गुन्हे करून निर्दोष सुटणाऱ्यांची संख्या कमी नाही. पाच वर्षांची शिक्षा भोगून गुन्हेगार पुन्हा उजळ माथ्याने समाजात फिरायला मोकळे. अशा भयंकर गुन्ह्यांविरुद्ध कठोर उपाययोजना करण्याची संवेदनशीलता सरकारमध्ये उरलेली नाही. गुन्हे घडत राहतात. विनाकारण निष्पापांचे बळी जात राहतात. निर्ढावलेल्या प्रवृत्तींचा हैदोस सातत्याने सुरू राहतो. शेकडो लोकांच्या डोळ्यादेखत गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना लवकरात लवकर कठोर शिक्षा झाल्याशिवाय अशा भयंकर घटना घडणे थांबणार नाही. आंध्र प्रदेशात महिलांवरच्या अत्याचाराविरोधात शक्ती नावाचा कायदा आहे. वीस दिवसांत अशा गुन्हेगारांना फासावर लटकवण्याची त्यात तरतूद आहे. अशाच स्वरूपाचा कायदा महाराष्ट्रातही आणण्याची वेळ आली आहे. दुसरीकडे लोकांच्या डोळ्यादेखत जेव्हा इतका क्रूर प्रकार घडतो तेव्हा त्या गुन्हेगाराइतकाच केवळ बघ्याची भूमिका घेणारा समाजही नराधम ठरतो. असे गुन्हे रोखण्याकरिता कठोर उपाययोजना न करणारे सरकारही कृतघ्नच ठरते.

# शारीरिक मानसिक व आध्यात्मिक जागृतीसाठी नित्यनियमाने योग आवश्यक-जितेंद्र बोरा

**बीड । प्रतिनिधी**

**मागील जवळपास सव्वीस वर्षापासून अविरतपणे मोफत सेवा देणारे बीड शहरातील दीपमाळ योगा ग्रुपची बालाजी मंदिर येथे सुरुवात करण्यात आली होती. मागील दहा वर्षापासून खंडोबा मंदिराच्या निसर्गरम्य परिसरामध्ये ब्रह्म मुहूर्तावर दररोज सकाळी साडेपाच ते सात या वेळेत योग वर्ग घेतला जातो.**




शुक्रवार दिनांक २१ जून जागतिक योग दिनाचे औचित्य साधून दीपमाळ परिसरात अभूतपूर्व असे योगा शिबिर घेण्यात आले. यामध्ये प्रास्ताविक व योग संदर्भात माहिती मा.जितेंद्र जी बोरा सर यांच्याकडून देण्यात आली योगाचे प्रात्यक्षिक मा.प्रशांतजी बोरा सर तसेच मधुमेह या आजारावर शास्त्रोक्त माहिती डॉ.राजेंद्र जी सारडा सर यांच्याकडून देण्यात आली सूर्यनमस्कार बीज मंत्राद्वारे प्रात्यक्षिक मा.विष्णुदासजी बीयाणी यांच्याकडून करण्यात आले. या शिबिरात शहरातील नागरिकांनी उस्फुर्त असा प्रतिसाद दिला. या शिबिरात शहरातील प्रतिष्ठित डॉक्टर्स, वकील, इंजिनियर्स, सीए आणि व्यापारी वर्ग तसेच सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते. यात प्रामुख्याने पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोकजी मुदीराज साहेब,दैनिक लोकाशा चे संपादक श्री विजयराजी बंब, गौतमजी खटोड गोपालजी कासट, डॉ. राहूलजी जाजू, डॉ. शिवप्रसादजी जाजू , अशोकजी शेटे, जवाहरजी सारडा, जयसिंग मामा चूंगडे, इंजिनिअर राहुलजी बोरा डॉक्टर वरदजी चरखा, मारुतीराव नाईकवाडे, मदनजी दुग्गड इत्यादी उपस्थित होते. या शिबिरास यशस्वी बनवण्यासाठी योगशिक्षक व सदस्य दीपकजी सोळंकी, आनंदजी चरखा, शीरढोणे सर, नागेशजी मिटकरी, महादेवजी गाढवे, अरुणजी बागडे, उत्तमजी राठोड, पप्पूजी मराठे, उपरेजी, झंवरजी, शुभम सारडाजी, व्यवहारेजी, मानकुसजी, अनिलजी मिटकरी, सोनटक्केजी, गोरेजी, राजू फटालेजी, भगवान फटालेजी, अक्षय पवळजी, रितेश बागमारजी इ. सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमानंतर अल्पोपहार देण्यात आला. या वर्गासाठी व इतर मार्गदर्शना साठी मा.जितेंद्र बोरा सर यांच्या मोबाईल क्र. ९४२२२४२३४२ वर संपर्क करावा

# नाळवंडी येथील ओबीसी आरक्षण प्रश्नी सुरु असलेले आंदोलन स्थगित




## राज्य शासनाने आरक्षण प्रश्न सोडवावा-डॉ.योगेश क्षीरसागर

राज्य शासनाने ओबीसी आरक्षण प्रश्नी सुरू असलेले उपोषण सोडविले आहे. ओबीसींच्या प्रश्नावर लवकरच बैठक घेऊन तोडगा काढला जाईल, अशी ग्वाही शासनाने दिली आहे. आता सर्वच समाजबांधवांनी सामाजिक सलोखा जपण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच, शासनाने देखील समाजाचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी राज्य शासनाकडे केली आहे.

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणाच्या बचावासाठी गेल्या १० दिवसांपासून वडीगोद्री (ता.अंबड, जि.जालना) येथे ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके हे उपोषणाला बसले होते. त्यांच्या समर्थनार्थ बीड तालुक्यातील नाळवंडी येथील संजय आबाराव काळे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मध्यस्थीने हे आंदोलन शनिवारी (दि.२२) स्थगित करण्यात आले.

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने वडीगोद्री येथे जाऊन प्रा.लक्ष्मण हाके यांच्याशी चर्चा केली. त्यांनतर त्यांनी उपोषण स्थगित केले. त्यापाठोपाठ राज्यभरात विविध ठिकाणी सुरू असलेली आंदोलने स्थगित करण्यासाठी राज्य सरकारच्या प्रतिनिधींकडून प्रयत्न केले जात आहेत. बीड तालुक्यातील नाळवंडी येथील संजय काळे यांनी आमरण उपोषण मागे घ्यावे म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट देऊन विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन संजय काळे यांनी उपोषण स्थगित केले. उपोषणकर्त्यांच्या मागण्या शासन दरबारी मांडू, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर दिली. यावेळी सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, मंडळ अधिकारी श्री.चांदणे, उपसरपंच बंडू मेहत्रे, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन गणेश राऊत, कल्याण तंबरे, पी.डी. राऊत, ग्रामपंचायत सदस्य संतोष राऊत, गुलाब शेख, गोरख काळे, शंकर लचके, शकुभाई सय्यद, भागवत लेंडाळ, श्रीपत काळे, धर्म राऊत, स्वप्निल मेहत्रे, अशोक वैद्य, श्री.बाळू काका यांच्यासह ओबीसी नेते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरीमध्ये घुसखोरीचा डाव उधळला, दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**जम्मू। वृतसंस्था**

उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील उरी येथील गोहलन भागात शनिवारी (दि.२२) सुरक्षा दलांनी घुसखोरीचा डाव हाणून पाडला. चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले आहेत. यापूर्वी बुधवार, २१ जून रोजी बालमुल्ला येथे झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. हे दोघेही तश्कर-ए-तैयबाशी संबंधित होते. अमरनाथ यात्रेसाठी जम्मू-काश्मीरमध्ये निमलष्करी दलाची तैनाती सुरू करण्यात आली आहे. जम्मू जिल्ह्याला यावेळी निमलष्करी दलाच्या २४ अतिरिक्त कंपन्या मिळाल्या आहेत, ज्या गेल्या वर्षीच्या तुलनेत पाच ते सहा अधिक आहेत. अमरनाथ यात्रेच्या मार्गावर प्रथमच तैनाती, यात्रेकरूंची थांबे, लंगर आणि इतर ठिकाणी तैनात करण्याव्यतिरिक्त, ज्या ठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता आहे अशा ठिकाणी निमलष्करी दल देखील तैनात केले जात आहेत.

# माजी मंत्री सुर्यकांता पाटील यांची भाजपला सोडचिठ्ठी



**हिंगोली । प्रतिनिधी**

**आपल्या स्पष्ट वक्तेपणासाठी फायर ब्रॅन्ड नेत्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी केंद्रीय राज्यमंत्री सुर्यकांता पाटील यांनी अखेर भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वासह हदगाव विधानसभा संयोजकपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे भाजपला मोठा धक्का बसला असून, त्या आता नेमका काय निर्णय घेतात याकडे लक्ष लागले आहे.**

माजी मंत्री सुर्यकांता पाटील यांनी १९८० ते १९८५ या कालावधीत हदगाव विधानसभेच्या काँग्रेसच्या आमदार म्हणून काम पाहिले. त्यानंतर सन १९८६ ते १९९१ या कालावधीत काँग्रेसच्या राज्यसभा सदस्य होत्या. तसेच १९९१ ते १९९६ मध्ये त्यांनी नांदेड लोकसभा निवडणुकीत विजय मिळविला. काँग्रेस पक्षाच्या फुटीनंतर त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यांना राष्ट्रवादीने २००४ मध्ये हिंगोली लोकसभेची उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत त्यांनी विजय मिळविला होता. केंद्रामध्ये त्यांना राज्यमंत्री पद देण्यात आले होते. दरम्यान, सन २०१४ मध्ये त्यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपात प्रवेश केला होता. मागील दहा वर्षापासून त्या भाजपामध्ये होत्या.

# खासदार वानखडेंनी कुलूप तोडून घेतला कार्यालयाचा ताबा

अमरावती। वृतसंस्था

खासदार कार्यालयाचा वाद अमरावतीत टोकाला पोहोचला आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटलांसमोरच आमदार यशोमती ठाकूर आणि खासदार बळवंत वानखडे यांनी आक्रमक भूमिका घेत शनिवारी (दि.२२) जिल्हाधिकारी कार्यालयातील खासदार कार्यालय ताब्यात घेतले. प्रशासनाकडून दडपशाही व दिरंगाईचा आरोप करत खासदार कार्यालयाचे कुलूप तोडून काँग्रेसने कार्यालय ताब्यात घेतले.

याआधी हे कार्यालय माजी खासदार नवनीत राणा यांच्याकडे होते. त्या पराभूत झाल्यामुळे हे कार्यालय काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार बळवंत वानखडे यांना मिळणे अपेक्षित होते. मात्र, या संदर्भात पत्र देऊनही प्रशासनाकडून कार्यालय ताब्यात देण्यास दिरंगाई करण्यात येत होती. त्यामुळे अखेर शनिवारी यशोमती ठाकूर यांच्यासह खासदार बळवंत वानखडे आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी आक्रमक होत कुलूप तोडून संबंधित कार्यालय ताब्यात घेतले आहे. यावेळी यशोमती ठाकूर यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटलांना उद्देशून, हवे तर आमच्यावर गुन्हे दाखल करा, मात्र आम्ही कार्यालय ताब्यात घेत आहोत, असे सांगितले.

## महाराष्ट्र गाजवणाऱ्या नाट्य कलाकारांचा अनिलदादा जगताप यांच्याकडून नागरी सत्कार!

# बीडच्या भूमिपुत्रांनी कलाक्षेत्रात पुन्हा एकदा जिल्ह्याची मान उंचावली-अनिल जगताप

**बीड । प्रतिनिधी**

**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या नाट्य संमेलना निमित्य जागर नाट्य कलेचा या उपक्रमा अंतर्गत अण्णा भाऊ साठे नाट्यगृह भायखळा मुंबई येथे पार पडलेल्या एकांकिका स्पर्धेत प्रगती सेवाभावी संस्था पाडळी जिल्हा बीडची संतोष पैठणे लिखित आणि दिग्दर्शीत नवस एकांकिका महाराष्ट्रातील साडे चारशे एकांकेतून सहा पारितोषिकासह सर्वोत्कृष्ट ठरली. या एकांकिकेस जागर करंडक, दोन लाख रुपये रोख व प्रमाणपत्र असे पारितोषिक देण्यात आले आहे. या निमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी नवस एकांकिकेचे लेखक दिग्दर्शक संतोष पैठणे आणि एकांकिकेतील सर्वच कलाकारांचा प्रतिष्ठित मान्यवर, पत्रकार तथा नागरिकांच्या उपस्थितीमध्ये भव्य नागरी सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यादरम्यान अनिलदादा जगताप यांनी नवस एकांकिकेतील सर्व कलाकारांचे कौतुक करत बीडच्या भूमिपुत्रांनी कलाक्षेत्रात जिल्ह्याची मान उंचावली असल्याचे मत व्यक्त केले. याबरोबरच अत्यंत कौतुकाची बाब म्हणजे नवस या एकांकिकेला मिळालेल्या यशाच्या श्रेयाचे मानकरी केवळ आणि केवळ संतोष पैठणे आणि एकांकिकेतील सर्व कलाकारच आहेत असे देखील सांगितले.**

बीड केंद्रावरून प्रथम आलेली नवस ही एकांकिका उपांत्य फेरीतून अंतिम फेरीत गेली होती, तब्बल साडेचारशे एकांकिकेतून उपांत्य फेरीला २७ एकांकिका आणि त्यातून अंतिम फेरीला नऊ एकांकिका सादर झाल्या. अभिनेते सुबोध भावे, अभिनेत्री मुक्ता बर्वे, विश्वास सोहनी, सतीश राजवाडे, डॉ अनिल बांदवडेकर असे दिग्गज प्रेक्षकांच्या माध्यमातून परीक्षण झाले. नवस एकांकिकेला लेखन उत्तेजनार्थ - संतोष पैठणे,दिग्दर्शन प्रथम - संतोष पैठणी, पुरुष अभिनय प्रथम - विठ्ठल जोगदंड , स्त्री अभिनय तृतीय- अंकुर तांगडे स्त्री अभिनय उत्तेजनार्थ- मानसी जाधव व सर्वोत्कृष्ट संघ असे एकूण सहा पारितोषिके मिळाली. बीड नाट्य परिषदेच्या माध्यमातून १०० व्या नाट्य संमेलनानिमित्त नाट्य जागर स्पर्धा झाल्या, त्यातून बीड विभागातून प्रथम आलेली एकांकिका शेवटपर्यंत प्रथमच राहील, मुंबईच्या अंतिम स्पर्धेसाठी ९ एकांकिकेतून महाराष्ट्रातून प्रथम येण्याचा मान बीड जिल्ह्याला मिळाला. या एकांकिकेत संतोष पैठणे, अंकुर तांगडे, विठ्ठल जोगदंड, मानसी जाधव, ऋषिकेश रत्नपारखी, अमोल गायकवाड, शितल चव्हाण, स्नेहा वरकटे, रोहित पुराणीक, शुभम चव्हाण, शाहरुख मिर्झा, सचिन पंडित, भूषण ढोबळे, गणेश भोसले, सोनाली मजमुले, आर्या दोडके यांनी भूमिका केल्या तर प्रकाश योजना -अक्षय फुलझळके, अशोक घोलप, संगीत -अशोक थोरात, पवन शिंदे. नेपथ्य - संतोष पैठणे, लक्ष्मीकांत दोडके, रंगभूषा- खंदारे. वेशभूषा- लक्ष्मीकांत दोडके. रंगमंच व्यवस्था- वेद निकम, शुभम खरे, अशोक काळेगावकर, संकेत बोंद्रे, निलेश माळी यांचा समावेश होता.



## कलाकारांचा बालेकिल्ला बीडच्या भूमिपुत्रांनी पुन्हा एकदा सिद्ध केले- अनिलदादा जगताप

कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीड जिल्हा सर्वश्रुत आहे किंबहुना हे वारंवार सिद्ध देखील होत आलं आहे. शंभराव्या नाट्य संमेलना निमित्य जागर नाट्य कलेचा या उपक्रमा अंतर्गत अण्णा भाऊ साठे नाट्यगृह भायखळा मुंबई येथे झालेल्या एकांकिका स्पर्धेत संतोष पैठणे लिखित आणि दिग्दर्शीत नवस एकांकिका महाराष्ट्रातील साडे चारशे एकांकेतून सहा पारितोषिकासह सर्वोत्कृष्ट ठरली. बीडच्या भूमिपुत्रांनी नाट्य क्षेत्रात दमदार अशी कामगिरी करत बीडची मान उंचावली आहे. कौतुकाची बाब म्हणजे नवस या एकांकिकेला मिळालेल्या यशाच्या श्रेयाचे मानकरी केवळ आणि केवळ संतोष पैठणे आणि एकांकिकेतील सर्व कलाकार आहेत. नवस एकांकिकेतील सर्व कलाकारांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

## पान १वरून...

### ३३ लाख ८३ हजार हेक्टरवर खरीपाची

आतापर्यंत ३३ लाख ८३ हजार हेक्टर वर खरीपाची पेरणी पूर्ण झाली आहे. ही पेरणी सरासरीच्या सुमारे २४ टक्के इतकी आहे. पूर्व विदर्भातील चार जिल्हे, नंदुरबार व पालघर जिल्ह्यांमधील १७ तालुक्यांमध्ये सरासरीच्या २५ टक्केही पाऊस झालेला नाही. त्यामुळे कोकण व पूर्व विदर्भातील भात लागवडीवर परिणाम झाला आहे. मान्सून वेळेवर दाखल होऊनही त्या तुलनेत त्याची प्रगती झाली नव्हती. परिणामी, राज्यातील १४६ तालुक्यांत ७५ टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाला आहे. त्यामुळेच नागपूर विभागात आतापर्यंत केवळ २.७१ टक्के तर, कोकण विभागातही केवळ ३.०९ टक्के पेरण्या झाल्या आहेत. राज्यातील २५ ते ५० टक्के पाऊस झालेल्या तालुक्यांची संख्या ६१, तर ५० ते ७५ टक्के पाऊस झालेल्या तालुक्यांची संख्या ६८ इतकी आहे. ७५ ते १०० टक्के पाऊस ५३ तालुक्यांमध्ये झाला आहे.

----------

### अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी

यांच्याशी अडीच तास चर्चा केली असून, अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी भरीव तरतूद करण्याचे संकेत दिले आहेत. या चर्चेत कृषी क्षेत्रातील काही मुद्यांचा आढावा घेण्यात आला. तर शेतकरी संघटना आणि कृषी तज्ज्ञानी काही सूचना केल्या. बैठकीला कृषी मुल्य व किंमत आयोगाचे माजी अध्यक्ष, कृषी अर्थतज्ज्ञ अशोक गुलाटी, ज्येष्ठ पत्रकार हरिश दामोदरन, भारत कृषक समाजाचे अजय वीर जाखड, इंडियन चेंबर ऑफ फूड अँड ॲग्रिकल्चरचे अध्यक्ष एम.जे. खान आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स अँड पॉलिसी रिसर्चचे प्रतिनिधि उपस्थित होते. या बैठकीत तीन मुद्यांवर विशेष सूचना उपस्थित प्रतिनिधीकडून करण्यात आली. त्यामध्ये एक म्हणजे कृषी संशोधनासाठी तरतूद, दुसरे म्हणजे खतावरील अनुदान, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि तिसरे म्हणजे निर्यात धोरणे. यासोबतच थेट हस्तांतरण योजनेचे एकत्रीकरण, हमीभाव, बियाण्यांवरील जीएसटी याबद्दलही अर्थमंत्र्यांना सूचना करण्यात आल्या. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर ग्रामीण भागात भाजपला मोठा फटका बसला. त्यामुळे शेती आणि ग्रामीण भागावर लक्ष केंद्रीय करण्याचा प्रयत्न सरकार करेल, असे बोलले जात आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात मोठ्या घोषणांची शक्यता व्यक्त केली जात आहे. या बैठकीत कृषी संशोधनाकडे लक्ष देण्याची सूचना महत्त्वाची ठरली. हरितक्रांतीनंतर देशातील कृषी संशोधनाची प्रक्रिया ठप्प झाली. दर्जेदार आणि आधिक उत्पादन देणाऱ्या वाणांची निर्मितीचे आव्हान समोर उभे राहिले आहे. पण अर्थसंकल्पात त्यासाठी भरीव आर्थिक तरतूदही केली जात नाही. त्यामुळं भारतीय कृषी संशोधन परिषदेसाठी अर्थसंकल्पातील ९ हजार ५०० कोटींची तरतूद २० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवावी अशी सूचना काही तज्ज्ञानी केली आहे.

----------

### मराठे आधी कोणाच्या

म्हणून आम्ही येणार हे सर्व मॅनेज आहे, असे सांगून मनोज जरांगे म्हणाले, मराठे आधी कोणाच्या अंगावर जाणार नाहीत, पण.. असा त्यांनी थेट इशारा दिला. हा इशारा नेमका कोणाला दिला आता यावरुन चर्चा होत आहे. जरांगे पुढे म्हणाले, आमच्या आरक्षणात ते आहेत. त्यांना धक्का लागतोय की नाही हे आम्हाला माहित नाही. आमच्या ओबीसी नोंदी आहेत. हक्काच्या नोंदी आहेत. अर्ध्या तासापूर्वी पुरावे मिळाले आहेत. लाखो नोंदी सरकारने दाबून ठेवल्या आहेत. ब्रिटीश कालीन जनगणनेत मराठा कुणबी दाखवलाय. १८७१ मधले पुरावे आहेत. ते ही घेत नाहीत असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. छगन भुजबळ १०० टक्के दंगल घडवणार. धनगरांनी वाद चिघळू देऊ नये. शेवटी निर्णय तुमचा आहे. त्यांचे वाघ आहेत, आमचे पण कुणीतरी असतीलच ना. महाराष्ट्रात रस्त्यावर उतरुन दंगल घडवून आणण्याला छगन भुजबळ जबाबदार असणार, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

-----------

### एनटीएच्या परिक्षा पध्दतीत

प्रवेश परीक्षा पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी इस्त्रो चे माजी अध्यक्ष डॉ के राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली समिती परीक्षा प्रक्रियेची यंत्रणा सुधारणे, डेटा सुरक्षा प्रोटोकॉल सुधारणे आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी ची रचना आणि कार्यप्रणाली सुधारण्या संदर्भातील शिफारशी करणार आहे.

-------------

### पेपरफुटी रोखण्यासाठी

एजन्सी(एनटीए) यांसारख्या प्रमुख संस्थांद्वारे आयोजित केलेल्या स्पर्धात्मक परीक्षांमध्ये अन्यायकारक मार्ग रोखणे हा या कायद्याचा उद्देश आहे. ५ मे रोजी सुमारे २४ लाख उमेदवारांसह एनईईटी (नीट) घेण्यात आली. यामध्ये विशेषत: बिहारमध्ये प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांचा सामना करावा लागला. याव्यतिरिक्त, परीक्षेच्या अखंडतेशी तडजोड झाल्याच्या संशयामुळे युजीसी एनईटी (नेट) पूर्णपणे रद्द करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, एनटीए ने शुक्रवारी अपरिहार्य परिस्थिती आणि समस्यांचा हवाला देऊन संयुक्त सीएसआयआर - युजीसी - नेट ची जून आवृत्ती पुढे ढकलण्याची घोषणा केली. ही चाचणी ज्युनियर रिसर्च फेलोशिप्स, असिस्टंट प्रोफेसरशिप्स आणि सायन्स कोर्समधील पीएचडी प्रवेशासाठी पात्रता ठरवते.

-----------

### राज्यसभेबाबत पंकजा

मुंडे यांनी यावर एका वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे. पत्रकार परिषदेत पत्रकारांनी याबाबत विचारले असता त्यावर मलाही अशी माहिती मिळत आहे, असे हसत हसत उत्तर दिले.

## छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी प्रकरणी बाळराजे आवरे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना जामीन मंजूर

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथे दिनांक १४ जून रोजी पहाटे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा केल्याप्रकरणी छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवळे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय केज यांनी जामीन मंजूर केला.

किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा १४ जून रोजी पहाटे छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठानच्या अध्यक्ष व त्यांच्या सहकाऱ्यांनी उभा केला होता याप्रकरणी त्यांना धारूर पोलिसांनी अटक केली होती त्यांना अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय केज यांनी पंचवीस हजार रुपये जात मुसलक्यावर जामीन मंजूर केला या कामी न्यायालयीन प्रक्रियेमध्ये धारूर न्यायालयातील विधीज्ञ ॲड. परमेश्वर शिनगारे ॲड.अमोल साखरे ॲड.सुरज नखाते ॲड.मोहन भोसले ॲड. राज नाईकवाडे ॲड. शादाब शेख ॲड.युवराज ॲड.रवी सावंत ॲड. संस्कार शिनगारे, ॲड.दादासाहेब मायकर यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.



# जुनं ते सोनं फक्त नावालाचं : ग्रामीण भागातील स्वयंपाक घरातून तांबे व पितळेची भांडी कालबाह्य ?

## बदल्या जीवनशैलीचा परिणाम तांबे व पितळी भांड्यांवर

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

पूर्वी घरोघरी जेवणात तसेच अन्न शिजविण्यासाठी तांब्याची व पितळेची भांडी मोठ्या संख्येने वापरात होती. त्याचा औषधी गुणधर्मही सर्वांना ठाऊक होता.मात्र बदल्या जीवनशैलीचा परिणाम तांबा व पितळी भांड्यांवरही पडल्याने परिणामी प्राचीन काळापासून वापरात असलेली ही भांडी आज अनेक घरांमधून कालबाह्य झाल्याचे दिसून येत आहे.

या पितळीच्या व तांब्यांच्या भाड्यांची जागा आता स्टेनलेस स्टील व फायबरच्या भाड्यांनी घेतली आहे.आरोग्य सुदृढ रहावे यासाठी पूर्वीच्या काळी पितळ व तांब्याची भांडी वापरली जात असत. मात्र काळाच्या ओघात ही भांडी दुर्मिळ झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. नव्या पिढीकडून रेडिओ, टीव्ही, जुन्या लाकडी खुर्च्यांसह अन्य जुन्या काळातील वस्तूंचा वापर होत नसल्याचे दिसते. यातच पितळ व तांब्याची भांडी देखील हद्दपार करून आता फायबर व स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचा वापर सर्रास सुरू झाला आहे.सध्याच्या काळात केवळ गरजे पुरताच तांब्याच्या भांड्यांचा वापर होताना दिसत असल्याने स्वयंपाक घरात पितळ व तांब्याच्या भांडी आता दुर्मिळच झाल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामीण भागासह शहरातूनही तांब्याची भांडे हद्दपार होत असल्याचे दिसून येते.दैनंदिन वापरात स्टील,फायबर यांचा वापर वाढला आहे. या वस्तूंवर विषाणू जमल्यास त्याचा नायनाट लवकर होत नाही.ही बाब आरोग्याकरिता धोक्याची ठरते, त्यामुळे तांबा व पितळ भांड्याचा गरज ओळखणे काळाची गरज आहे.जुनं ते सोनं' असं म्हणतात; पण सध्या हेच सोनं कवडीमोल दराने विकलं जातयं. एकेकाळी स्वयंपाकगृहाचा कणा असलेली तांब्या आणि पितळेची भांडी स्वयंपाकगृहातून नव्हे तर अगदी घरातूनच हद्दपार होतायत.तांब्या, पितळची जागा आता स्टिलने घेतलीय. टिकाऊ पेक्षा दिखाऊ पणाला महत्व आल्याने जुनी भांडी मोडीत काढली जातायत. ऐतिहासिक अन् पारंपारिक अशा जुन्या स्मृती ठराविक लोकांकडूनच जपल्या जातात. काही वेळा त्यांना उजाळाही देण्याचे काम केले जाते.काही ठिकाणी मात्र हाच जुना ठेवा नाहीसा करण्याचं काम केलं जातं. तांबे व पितळची भांडी कालबाह्य झाली असल्याने मोडित घातली जात आहेत.वर्षानुवर्षे जतन करून ठेवला जाणारा लाखमोलाचा ठेवा आता मोडीत काढल्याने कालबाह्य झाला आहे.आजही ग्रामीण भागात जुन्या तांब्या-पितळ्याची भांडी क्वचितच पाहायला मिळत आहे.







### तांबे,पितळी भांडी जतन करण्याची आवश्यकता

अलिकडच्या काळात तांबे, पितळ अशा धातूंपासून तयार केलेली ताट,वाटी, चमचा,घंगाळ, तपेले,बादली, परात,कळशी,हंडा आदी भांडी कालबाह्य झाली आहेत.अशी काही भांडी जर जतन करून ठेवली नाहीतर भविष्यात ही भांडी पाहण्यासही मिळणार नाहीत, अशी परिस्थिती सर्वत्र पाहायला मिळेल.

### देवपुजेची भांडी दुर्मिळच

पूर्वी पितळी समई, निरंजन,ताट,तांब्या तसेच चमचा यांचा वापर जास्त करून देवपूजा करण्यासाठीच केला जायचा.मात्र काळाच्या ओघात ही देवपूजेची भांडी दुर्मिळ होत गेली. दुर्मिळ झालेली भांडी नंतर मोडीतच आली. वर्षानुवर्षापासून तांब्यांचे हंडे, पातेली,ताट आदी देवपूजेसाठी तसेच संसार उपयोगी भांडी लोकांकडून वापरली जायची. मात्र बदलत्या काळानुसार प्लॅस्टिक व ॲल्युमिनिअम पासून तयार केलेली भांडी वापरात येवू लागली.तेव्हापासून ही भांडी वापराविना पडून राहू लागली. पडून राहिलेली भांडी कवडीमोल दराने मोडित काढली गेल्याने ती आता कालबाह्य झाली आहेत.

### सध्या स्टील, अल्युमिनियमच्या भांड्यांना पसंती

लग्न समारंभात रूखवतात ठेवल्या जाणाऱ्या पितळेच्या, तांब्याच्या भांड्याची जागा स्टीलच्या भांड्यांनी घेतली आहे.वजनाला हलके आणि स्वस्त असलेल्या स्टील व ॲल्युमिनिअमपासून बनविण्यात आलेली ताट,वाटी,चमचा आदी भांडी लग्न, वास्तूशांती अशा कार्यक्रमांमध्ये आजच्या काळात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे

## रोहन गलांडे यांच्या अमरण उपोषणाला आले यश !

### काम पुर्ण होईपर्यंत आमरण उपोषणाला स्थगिती –रोहन गलांडे पाटील

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यात चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज तीर्थ क्षेत्राचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे यासाठी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील दि.१७ /०६/२०२४ रोजी वेळ सायंकाळी ६ वाजता आमरण उपोषणास बसले होते व आज त्यांच्या आमरण उपोषणाला यश आले आहे व त्यांच्या मागण्या आशा होत्या की की श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाचा मंजूर निधी श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्रा साठीच खर्च करण्यात यावा, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत गावकऱ्यांची ऐक समीती असेल, तीर्थक्षेत्राचे काम निकृष्ट दर्जाचे होऊ नये याला जबाबदार काम करणारा गुत्तेदार जबाबदार राहील, तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण झाल्यानंतर गावकऱ्यांना खर्च झालेल्या निधीची माहिती देण्यात यावी.अशा मागण्या असुन रोहन गलांडे यांनी म्हटले आहे की चिंचोली माळी गावचा नागरीक म्हणून माझ्या एवढ्या मागण्या प्रशासनाला मान्य असतील तर मी माझ्या श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र निधी ५० लाख निधी साठी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला तीर्थक्षेत्राचे काम पूर्ण होईपर्यंत स्थगिती देणार आहे अशा मागण्या रोहन गलांडे पाटील यांच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी अतुल मुंडे व ढाकने साहेब यांनी रोहन गलांडे यांना लेखी पत्र देऊन मागण्या मान्य केल्या आहेत त्यामुळे रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे १९/०६/२०२४ रोजी उपोषनाला स्थगिती दिली यावेळी रोहन गलांडे यांनी सहकारी जेष्ठ पत्रकार, संपादकीय विभाग,व सहकारी वृत्तपत्र दैनिकाचे प्रथम नतमस्तक होऊन आभार व्यक्त केले यावेळी उपस्थित उपस्थित शरद चंद्रजी पवार राष्ट्रवादी गटाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे साहेब, ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, जेष्ठ नेते सुरेष तात्या पाटील, माजी सरपंच सुनील बापु देशमुख, ठाकरे गटाचे शिवसेना तालुकाप्रमुख अशोक जाधव,जेष्ठ समाजसेवक हनुमंत भोसले सर,जेष्ठ पत्रकार रामदासजी तपसे, युवा नेते युवराज मगर सर, तात्या रोडे, गावातील प्रतीष्ठीत नागरीक निष्ठावंत शिवसैनिक लक्षीमन गलांडे, जेष्ठ नेते राममेजर राऊत, जेष्ठ शिवाजी आबा गायकवाड पत्रकार अनिलजी गलांडे सर ,राजाभाऊ मोटे,ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत,नाना नेमट,युवा नेते दत्ता गलांडे,अमर घोडके,रवी गायकवाड, रमेश देशमुख,डिंगाबर मगर,बाळासाहेब घोडके,राम नखाते असे समस्त गावकऱ्यांचा उपस्थित सहकारी रोहन गलांडे पाटील यांनी अमरण उपोषणाला स्थगिती दिली आहे.




## अजय कापरे यांना समाज सेवा राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर, उद्या मुंबईत होणार मान्यवरांच्या हस्ते वितरण सोहळा

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील रुई नालकोलचे भूमीपुत्र तथा पनवेल येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते अजय कापरे हे गेल्या १२ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रांमध्ये कार्यरत असून अनेक सामाजिक व विद्यार्थी, युवक, शेतकरी, गोरगरीब सर्वसामान्यांच्या, विविध घटकांतील प्रश्न वेळोवेळी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याने त्यांना सामाजिक कार्यात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने रविवार दि २३ जून रोजी आयोजित शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त महाराष्ट्र स्वाभिमान गौरव समाज सेवा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती अध्यक्ष प्रकाश जाधव व सचिव सुरज भोईर यांनी दिली.

अजय कापरे यांनी २०१५ मध्ये पनवेल येथील स्व .राहुल पाटील, आर आर फाऊंडेशन ,आष्टी तालुका युवा पत्रकार संघ अध्यक्ष अविनाश कदम व सर्व पत्रकार यांच्या मदतीने आष्टी तालुक्यातील दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांना बी बियाणे खते , गरजवंताला अन्न धान्य किराणा आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत केली .कोरोना काळात हि अनेक वेळा मदत केली आज ही पनवेल मधील बेघर मुलांना अन्नदान करत असतात त्यांच्या या कार्याची दखल मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात येत असतात. या वर्षीचा २०२४ चा उत्कृष्ट समाज सेवा पुरस्कार अजय कापरे यांना जाहिर झाला असून उद्या रविवारी मुंबई पत्रकार संघ येथील पत्रकार भवन आझाद मैदानाजवळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तर अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने धार्मिक, सामाजिक, साहित्य, कला, क्रीडा, पत्रकारित, कृषी व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय उत्कृष्ट पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.यावर्षी सामाजिक कार्यकर्ते अजय कापरे यांना समाज सेवा राज्यस्तरीय उत्कृष्ट पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



पान ६ वरून...

### धारूर येथील चोरी झालेले

माहितीनुसार ए.टी.एम.मध्ये जवळपास २० लाख रुपये रक्कम असल्याची माहिती आहे.यावेळी ए.टी.एम. पळवण्यात वापरलेले वखहन पोलिसांना बाजूलाच आढळून आले.पोलिसांनी तातडीने हालचाल केल्याने ए.टी.एम.मधील रक्कम चोरट्यांना पळवता आली नाही.सदरील घटनेचा पुढील तपास धारूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे व माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक विजयसिंह जोनवल हे करत आहेत.

### आ.नमीता मुंदडा जलजिवनच्या

नमीता मुंदडा या आमदारा नसुन ग्रामपंचायत सदस्य आहेत असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे तरी आमदारा नमीता मुंदडा यांनी चिंचोली माळी येथील जलजिवनच्या कामाची स्वता येऊन पहानी करावी जर कामात खोट निघाली तर आमदारा नमीता मुंदडा यांना ५१ रूपये बक्षीस देऊन सत्कार करुन वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येईल असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

### ॲड.रिजवान शेख यांना

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात येत असतात. या वर्षीचा २०२४ चा उत्कृष्ट समाज सेवा पुरस्कार ॲड रिजवान शेख यांना जाहिर झाला असून रविवारी मुंबई पत्रकार संघ येथील पत्रकार भवन आझाद मैदानाजवळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तर अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने धार्मिक, सामाजिक, साहित्य,कला,क्रीडा,पत्रकारित, कृषी व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय उत्कृष्ट पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. यावर्षी सामाजिक कार्यकर्ते ॲड रिजवान शेख यांना समाज सेवा राज्यस्तरीय उत्कृष्ट पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### अंबाजोगाईच्या शासकीय

व अस्थिव्यंग अशा तिन्ही प्रवर्गातील मुलांना शिक्षण व वसती गृहासाठी प्रवेश दिला जातो. ही शासकीय संस्था असल्याने प्रवेशार्थींना सर्व सुविधा मोफत मिळतात. अंबाजोगाई चा शासकीय बहुउद्देशीय संमिश्र दिव्यांग केंद्राला दिव्यांग शिक्षणाचा चांगला इतिहास, मोठा वारसा आणि यशाची परंपरा असल्याने संस्थेने नावलौकिक प्राप्त केलेले आहे.चालू शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पहिली ते दहावी प्रवेश प्रक्रिया सुरू असून या शासकीय दिव्यांग संस्थेचा अर्थातच संमिश्र केंद्राचा मराठवाड्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त प्रवेश घेऊन आपल्या शिक्षण व पुनर्वसनाचा मार्ग सुकर करावा असे आवाहन संस्थेच्या वतीने अधीक्षक श्रीमती आर एस मोरे यांनी केले आहे.

### शक्तीपीठ महामार्गास तीव

विभागीय बैठक संपन्न झाली.याबाबत शेतकऱ्यांनी मराठवाडाभर संवाद यात्रा देखील काढली तर अनेक ठिकाणी तीव्र आंदोलन देखील झाली.सरकारकडून हा महामार्ग होणार नाही असे सांगण्यात येत आहे तर दुसऱ्या बाजूला जमीन संपादित करण्यासाठी आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली आहे ही बाब शेतकऱ्यांच्या लक्ष्यात आलेली असल्याने हे आंदोलन अधिक तीव्र बनले.शुक्रवार दि २१ रोजी बीड जिल्ह्यातील परळी-अंबाजोगाई येथील शेकडो बाधित शेतकऱ्यांची बैठक वरवटी व धायगुडा पिंपळा या ठिकाणी संपन्न झाली.या बैठकीत सरकारला शेतकऱ्यांच्या विरोधात जाऊन महामार्ग बनवायचा असेल तर भविष्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सरकारला देण्यात आला.या प्रसंगी अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष एड.अजय बुरांडे यांच्यासह माजी न्यायाधीश बी.आर तिडके, अँड.एल.एन.शिंदे, वरवटी गावचे सरपंच सुधीर चाटे सह मोठ्या संख्येने शेतकरी आणि गावकरी उपस्थित होते.शक्तिपीठ श्रद्धेचा भावनिक मुद्दा धरून मागणी नसताना देखील हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन हजारो एक्कर सुपीक, बागायती जमीन संपादित करून शेतकऱ्यांना कायम स्वरूपी भूमिहीन करत भिकेला लावणारा हा शक्तीपिठ महामार्ग नसून कंत्राटदार हित महामार्ग आहे.विधान सभा निवडणुकीच्या तोंडावर केवळ शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यासाठी स्थगिती दिल्याची घोषणा सत्ताधारी करत आहेत.यापूर्वी देखील अतिरीक्त ऊस अनुदान, सोयाबीन, कापूस भावांतर याबद्दल देखील सत्ताधा-यांनी घोषणा केली मात्र शून्य अंमलबजावणी झाली.

–ॲड.अजय बुरांडे, शेतकरी नेते, बीड

## विद्यार्थ्यांचा प्रवास एसटीच्या मदतीने होणार सुखकर

**परळी । प्रतिनिधी**

एसटी महामंडळाच्या विविध सवलतीच्या योजना पासून शाळा आणि शालेय विद्यार्थी दूरच राहिले आहेत त्यामुळे यावर्षी बीड विभागातील परळी वैजनाथ एसटी आगाराकडून विद्यार्थी प्रवास पास सवलतीसह अनेक सवलतींच्या योजनांची माहिती प्रत्येक शाळेत पोहोचवली जात आहे परिणामी विविध प्रवासांच्या योजना विद्यार्थी वर्गाला तसेच शिक्षकांना समजण्यास मदत मिळत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवास आता सुखकर होण्यास मदत होणार आहे.

जूनच्या मध्यावर शाळा सुरू होतात ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या शाळा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मासिक प्रवास पास करिता मोठी गर्दी होत असते. पाचवी ते बारावीपर्यंत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ही योजना विद्यार्थिनी साठी मोफत पास योजना असल्याने या योजनेस प्रतिसाद चांगला मिळतो. या योजनेशिवाय विद्यार्थी आणि शाळा पर्यंत एसटी महामंडळाच्या इतर प्रवासाच्या सवलतीची माहिती पोहोचली जात नव्हती परिणामी विद्यार्थी वर्ग याबाबत अनभिज्ञ राहत होता मात्र याबाबत परळी वैजनाथ एसटी आगाराच्या वतीने शाळा महाविद्यालयात विविध पास व सवलतीचा जागर केला जात आहे.

परळी एसटी आगर प्रमुख संतोष नागनाथआप्पा महाजन यांच्यासह आगारातील कर्मचारी हे शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे देण्यात येणाऱ्या विविध शालेय पास व सवलतीच्या लाभाविषयी माहिती देत आहेत तसेच नियमित विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर प्रवास पास योजनेतून विद्यार्थिनींना मोफत पास शाळेतच मुलांच्या हाती देण्याची सोय उपलब्ध केली आहे. शहरात ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणासाठी येतात ज्या गावात मासिक पास सवलत धारक विद्यार्थ्यांची संख्या जास्त असून एसटी फेऱ्या कमी आहेत.विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न देखील या माध्यमातून केला जात आहे तर आवश्यकतेनुसार काही मार्गावर फेऱ्या उपलब्ध केल्या जात आहेत.

एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर साहेब व बीड विभागाचे विभाग नियंत्रक श्री अजय कुमार मोरे साहेब यांचे आदेशानुसार दि २२ जून २०२४ रोजी परळी आगाराचे आगार व्यवस्थापक संतोष महाजन, वाहतूक निरीक्षक बळीराम दराडे, संतोष चव्हाण ,वरिष्ठ लिपिक विजय सोनवणे यांनी परळी तालुक्यातील पापनाथेश्वर विद्यालय नाथरा,आसुबाई विद्यालय मांडखेल,महाराष्ट्र विद्यालय मोहा या शाळेंना प्रत्यक्ष भेट देऊन महामंडळातील विविध सवलती बाबतची माहिती मुख्याध्यापक तसेच शिक्षक वर्गांना देऊन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत मोफत २८० पासेसचे वितरण केले आहे या प्रसंगी परळी आगाराचे वतीने प्रतिनिधिक स्वरूपात विद्यार्थिनींना वही व पेन भेट दिली आहे.या भेटी दरम्यान पापनाथेश्वर विद्यालय नाथरा येथे मुख्याध्यापिका कराड मॅडम,आसूबाई विद्यालय मांडेखेल येथील मुख्याध्यापक सुरेश बुरांडे तर तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठी शाळा असलेल्या महाराष्ट्र विद्यालय मोहा येथे संस्थेचे सचिव कॉ.एड.अजय बुरांडे सर यांच्यासह मुख्याध्यापक विनायक राजमाने, उपमुख्याध्यापक मुरलीधर बोराडे व सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.




**परळी आगाराकडून विद्यार्थ्यांनीना शाळेतच प्रवास पास वाटप**

## योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा राजकिशोर मोदी यांच्या वतीने सन्मान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याचे प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ यांनी त्यांचे काही निवडक सहकारी जसेकी कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर, शिवाजीराव चौसाळकर, केशवराव कुर्डूकर, सदाशिवराव जोशी यांनी एकत्र येऊन इ.स. १९१७-१८ मध्ये पहिली ते सातवी पर्यंत प्राथमिक शाळा सुरु केली नंतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी १९३६ साली हायस्कूल सुरू करून संस्था वाढविण्याचे काम केले.त्यांनी सुरु केलेल्या श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सन्मान व सत्कार बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कार्यालयात जाऊन त्यांचा सन्मान व सत्कार केला. यावेळी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, प्रा वसंत चव्हाण, कार्यकारी संचालक संकेत मोदी प्रा डॉ गणेश पिंगळे, तंत्र निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य रमण देशपांडे उपस्थित होते.



पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी राजकिशोर मोदी यांनी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कार्याचा गौरव केला. स्वामीजींच्या पावन स्मृती आजही या संस्थेला प्रवृत्त करतांना दिसून येतात. योगेश्वरी शिक्षण संस्थेने आजपर्यंत हजारो विद्यार्थी घडविले आहेत. त्यातील अनेक विद्यार्थी देशात अनेक ठिकाणी मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत याचा या संस्थेला सार्थ अभिमानच असल्याचे राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. आपणही या संस्थेच्या उभारणीसाठी सदैव तत्पर राहु असे आश्वासन यावेळी मोदी यांनी दिले.श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ व राजकिशोर मोदी यांच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आलेल्या संचालक मंडळात संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष अँड जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य, सहसचिव प्रा.भीमाशंकर शेटे, सचिव कमलाकर चौसाळकर, जेष्ठ सल्लागार प्रा. नारायण गोळेगावकर, प्रा. माणिक लोमटे, संचालक प्रा. अभिजीत लोहीया, डॉ. जयश्री मोरेगावकर , लंकेश वैदय ,पाशु करीम सय्यद, प्रताप पवार ,अंगदराव कऱ्हाड, रमण सोनवळकर,अँड कल्याणी विर्धे, यांचा समावेश होता. संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष चंद्रशेखर बरदापुरकर यांनी आम्ही सर्व संचालक मंडळ हे अतिशय जबाबदारीने कार्य करून संस्थेची गुणवत्ता वाढवण्यासाठी मेहनत घेऊन महाविद्यालयात येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा विकास करू असे सांगितले. त्याचबरोबर आम्हा सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व आमच्या संचालक मंडळाकडून व्यक्त केली असलेली अपेक्षा पुर्ण करण्यासाठी कटिबद्ध असू असे आश्वाशीत केले.

संस्थेचे संचालक गणपत व्यास यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी संस्था चालवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. मागील वीस ते पंचवीस वर्षांपासून संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा कायापालट केला असल्याचे आवर्जून सांगितले. मोडकळीस आलेल्या महात्मा फुले वसतिगृहाची अतिशय अद्यावत अशी वास्तू उभा केली आहे. ज्यामध्ये ग्रामीण भागातील अनेक गरीब व होतकरू विद्यार्थी राहून आपले शिक्षण पूर्ण करत आहेत. त्याचबरोबर संपूर्ण महाविद्यालयाची इमारत देखील अतिशय जीर्ण होऊन मोडकळीस आली होती ती इमारत नव्याने बांधून तयार केल्याचे व्यास यांनी नमूद केले. महाविद्यालयाच्या या उभारणीसाठी महाविद्यालयाच्या अनेक माजी विद्यार्थ्यांचे आर्थिक पाठबळ लाभल्याचे आवर्जून उल्लेखित केले. तसेच यापुढेही कालानुरूप महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा कशा प्रकारे वाढविता येईल याचा कसोशीने सर्व संचालक मंडळाच्या वतीने केला जात असल्याचे गणपत व्यास यांनी सांगितले. या सन्मान समारंभाचे सूत्र संचलन शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी केले तर आभार प्रा.गणेश पिंगळे यांनी व्यक्त केले.

# कडधान्यासाठी केंद्र सरकार राबविणार उपक्रम

पुणे: डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्णता आणण्यासाठी व पीक वैविध्य राखण्यासाठी, किमान आधारभूत किंमत अर्थात हमीभावाने तूर, उडीद आणि मसूर खरेदी करण्यास केंद्र सरकार वचनबद्ध आहे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण तथा ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केले. नवी दिल्लीत कृषीभवन येथे विविध राज्यांच्या कृषिमंत्र्यांसोबत दूरदृश्य माध्यमातून घेतलेल्या बैठकीच्या वेळी ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून इ-समृद्धी संकेतस्थळ सुरू केल्याची माहिती देत, या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून ही कडधान्ये हमीभावाने विकत घेण्यास सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. शेतकऱ्यांना खरेदीच्या दृष्टीने आश्वस्त करण्यासाठी या संकेतस्थळावर अधिकाधिक शेतकऱ्यांनी नोंदणी करण्यास प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी राज्यांना केले. या पिकांच्या उत्पादनाबाबत देश अद्यापि स्वयंपूर्ण नाही, मात्र २०२७ पर्यंत स्वयंपूर्ण होण्याचे देशाचे उद्दिष्ट आहे, असे चौहान यांनी सांगितले.



डाळींचे उत्पादन ५० टक्क्यांनी वाढवण्यासाठी २०१५-१६ पासून प्रयत्न केल्याबद्दल चौहान यांनी राज्यांची प्रशंसा केली, मात्र त्याचवेळी, हेक्टरी उत्पादन वाढवण्यासाठी तसेच डाळींच्या उत्पादनाकरिता शेतकर्यांना प्रेरणा देण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. मूग आणि चणा यांच्या उत्पादनात देश स्वयंपूर्ण झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि गेल्या दहा वर्षांत आयातीवरील अवलंबित्व ३० टक्क्यांवरून १० टक्क्यांवर आणण्यात देशाला यश आल्याचाही त्यांनी उल्लेख केला. भारताला अन्नधान्य उत्पादनात केवळ स्वयंपूर्णच नव्हे, तर जगाचे फूड बास्केट बनवण्यासाठी राज्यांनी केंद्र सरकारच्या सहयोगाने काम करायला हवे, अये आवाहन चौहान यांनी केले. चालू खरीप हंगामापासून राबवल्या जात असलेल्या नवीन मॉडेल डाळी ग्राम योजनेची माहिती त्यांनी दिली. राज्य सरकारांनी भाताच्या कापणीनंतर उपलब्ध पडीक जमिनीचा वापर डाळींच्या पेरणीसाठी करावा असे आवाहन त्यांनी केले. राज्य सरकारांनी तूर डाळीचे आंतरपीक जोमाने घ्यावे, अशी सूचना चौहान यांनी केली. चांगल्या दर्जाच्या बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी, भारत सरकारने १५० डाळ बियाणी केंद्र उघडली असून आणि कमी उत्पादकता असलेल्या जिल्ह्यांमध्ये आयसीएआरद्वारे विभागवार प्रात्यक्षिके दिली जात आहेत, असे त्यांनी सांगितले. आयात कमी करण्याच्या दृष्टीने देशातील डाळींचे उत्पादन वाढविण्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज लक्षात घेऊन ही बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक, बिहार, तेलंगणा या प्रमुख कडधान्य उत्पादक राज्यांचे कृषी मंत्री उपस्थित होते. केंद्रीय मंत्र्यांनी राज्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले, तसेच सर्व राज्यांच्या कृषी मंत्र्यांनी आपल्या राज्यातील कृषी परिस्थितीबाबत आढावा बैठकीसाठी आणि कोणत्याही समस्यांचे एकत्रितपणे निराकरण करण्यासाठी दिल्लीमध्ये यावे असे आवाहन केले.

## राज्यांनी आपसात समन्वय राखावा

राज्य सरकारांनी आपल्या सर्वोत्तम पद्धतींचे आदान प्रदान करावे, आणि त्यासाठी एकमेकांच्या राज्यांना भेट द्यावी, असे त्यांनी नमूद केले. खासदार, आमदार यांसारख्या निवडून आलेल्या लोक प्रतिनिधींनी कृषी विज्ञान केंद्रांमध्ये सक्रिय सहभाग घ्यायला हवा, असे त्यांनी नमूद केले. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाच्या माध्यमातून केंद्राकडून केल्या जात असलेल्या प्रयत्नांची राज्य सरकारांनी प्रशंसा केली, आणि पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. उच्च उत्पन्न देणाऱ्या बियाण्यांचे वितरण वाढवण्याची, तसेच कडधान्याखालील क्षेत्र तातडीने वाढवण्याची गरज असल्याचे राज्यांनी यावेळी नमूद केले.

# 'पशुसंवर्धन' योजनेतून मिळणार ३ टक्के व्याज सवलत!



केंद्र सरकारने दुग्ध व्यवसाय आणि पशु संवर्धनाला चालना देण्यासाठी दोन महत्त्वाच्या योजनांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन, सुधारित योजने अंतर्गत, शेतकरी आणि इतर इच्छुकांना बँकेकडून घेतलेल्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत मिळणार आहे. यापूर्वी, दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन यासाठी दोन स्वतंत्र योजना राबवल्या जात होत्या. आता त्यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे, ज्यामुळे या दोन्ही क्षेत्रांचा विकास अधिक चांगल्या प्रकारे करता येईल. सुधारित योजनेचा लाभ शेतकरी उत्पादक संस्था, खासगी कंपन्या, वैयक्तिक उद्योजक, सेक्शन आठ नोंदणीकृत कंपन्या, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग आणि सहकारी दुग्ध संघ यांना घेता येईल.

योजनेत काय समाविष्ट आहे ?: नवीन आणि विद्यमान दुग्ध प्रक्रिया केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण आणि स्वच्छ दुग्ध प्रक्रिया आणि पॅकेजिंग. विपणन पायाभूत सुविधा, दूध वाहतूक सुविधा आणि संशोधन आणि विकास यांना प्रोत्साहन. अक्षय ऊर्जा वापर, मूल्यवर्धित दुग्धजन्य पदार्थ निर्मिती आणि पशुखाद्य निर्मिती आणि बळकटीकरण यांसारख्या सुविधांसाठी मदत.

या योजनेचा लाभ कसा घ्यावा ?: अधिक माहितीसाठी आणि अर्ज करण्यासाठी, जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयाशी संपर्क साधा. आवश्यक कागदपत्रे जमा करा आणि पात्रता निकष पूर्ण करा. मंजूरी मिळाल्यास, कर्जासाठी बँकेकडे अर्ज करा आणि ३ टक्के व्याज सवलत मिळवा. दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धनात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्यांना या योजनेमुळे मदत होईल. या योजनेचा लाभ घेऊन शेतकरी आणि इतर इच्छुक व्यक्ती आपल्या व्यवसायाचा विस्तार करू शकतात आणि त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात. या योजनेमुळे राज्यातील दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

# हूमणी अळीच्या नियंत्रणासाठी 'प्रकाश सापळा'

भारतात, हूमणी अळीचा प्रादुर्भाव विविध पिकांवर आढळतो. यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान सुद्धा होते. या किडीच्या नियंत्रणासाठी पीक लागवड पूर्वी पासून एकात्मिक नियंत्रण उपाय करणे गरजेचे असते. कारण वेगवेगळ्या अवस्थेत या किडी पिकांना नुकसान पोहोचवितात. उभ्या पिकात प्रौढ हूमणी अळीचे नियंत्रण करण्यासाठी 'प्रकाश सापळा' हा सर्वात चांगला उपाय असून अगदी कमी पैशात सहज करता येणारा आहे.

खोड, मुळ्या फस्त करते हूमणी: हूमणी अळीपूर्वीची पतंग ही त्याची प्राथमिक अवस्था असते. खरीप हंगामात ज्यावेळी पाऊस पडत नाही आणि अवर्षणजन्य स्थिती निर्माण होते. त्यावेळी हूमणी अळीचे पतंग जमिनीत अंडी घालतात आणि त्या अंड्यातून निघालेली हूमणी अळी ही खोड व मुळे फस्त करते. त्यामुळे शेतातील उभ्या पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. प्रादुर्भाव जास्त झाल्यास संपूर्ण शेतात वेगवेगळ्या जागी मोठ्या प्रमाणात झाडे वाळून जातात. विशेषत: ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात ह्या किडीमुळे होणारे नुकसान जास्त आढळून येते

प्रकाश सापळ्यांचा वापर करून असे करा नियंत्रण :

शेतकऱ्यांनी लिंबाच्या किंवा बाभळीच्या झाडाखाली संध्याकाळी शेतात प्रकाशासाठी बल्ब लावून त्याखाली पसरट भांड्यात पाणी ठेवून त्यावर ऑइल किंवा रॉकेलसारखे खनिज द्रव्याचा थर पसरावा. त्या प्रकाशामुळे पतंग बल्बकडे आकर्षित होऊन भांड्यातील पाण्यात पडून खनिज द्रव्यामुळे मरतात. या पद्धतीने हूमणी अळीचे नियंत्रण करता येते. अलीकडच्या काळात प्रकाश आणि गंध सापळा यांना एकत्रित करून एक नवीन प्रकाश-फेरोमोन कॉम्बो कीटक सापळा विकसित करण्यात आलेला आहे. हा सापळा पर्यावरणास अनुकूल, असून हूमणी अळीचे नियंत्रण करण्यास कार्यक्षम आहे.



# खरीप पिकांतील 'पैसा किडीचे' असे करा एकात्मिक व्यवस्थापन

खरीप पिकांची लागवड झाल्यावर सर्वात मोठ्या प्रमाणात कोणत्या किडीचा प्रादुर्भाव होत असेल तर तो पैसा किडीचा. या किडीला वाणी किंवा तेलंगी अळी किंवा मिलीपीड अशा नावाने सुद्धा ओळखले जाते. ही कीड सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद पिकावर मोठ्या प्रमाणात येते. पैसा/वाणी म्हणजेच मिलीपीड या किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येतो.

मिलीपीड ही एक निशाचर कीड असून, सामान्यत: सडणारी पाने तसेच काडीकचरा, कुजणाऱ्या वनस्पती इत्यादी पदार्थांना खाऊन उपजीविका करते. साधारणपणे निसर्गात यांची भूमिका कुजलेल्या काडी कचरा विघटन करण्यास मदत करणारा प्राणी अशी आहे. परंतु जेव्हा त्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढते तेव्हा ते जमिनीवर संपर्कात येणारे रोपटे, अंकुरलेले बियाण्यांना खाऊन नुकसान करतात, जमिनीलगत रोपे कुरतडून टाकतात. पैसा/वाणी किडींनी कुरतडल्यामुळे रोपांची संख्या कमी होऊन दुबार पेरणीची वेळ येऊ शकते. शेतकरी बांधवांनी जागरूक राहून वेळोवेळी पिकाचे निरीक्षण करून या किडीचे एकात्मिक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

जीवनक्रम : मिलीपीड किडीच्या अंडी, अळी व प्रौढ या अवस्था आढळून येतात. अंडी जमिनीत काही इंच खोलीवर टाकली जातात. एक मादी साधारणपणे ३०० च्या जवळपास अंडी घालते. अळीच्या पाच अवस्था आढळून येतात. प्रौढ अवस्था ही प्रदीर्घ काळाची आहे. संपूर्ण जीवनक्रम हा पाच ते सात वर्षात पूर्ण होतो. या किडीच्या वाढीसाठी जमिनीत आर्द्रता असणे आवश्यक आहे त्यामुळे पावसाळ्यात किंवा जिथे ओलिताची सोय आहे अशा ठिकाणी ही कीड जास्त सक्रिय असते. हवामान अनुकूल नसल्यास ही कीड जमिनीत सुप्त अवस्थेत राहते.



एकात्मिक व्यवस्थापन : शेतातील पालापाचोळा किंवा वाळलेले कुजलेले काडी कचरा गोळा करून नष्ट करावा. वाणी रात्री सक्रिय असल्याने रात्रीच्या वेळी शेतात गवताचे ढीग करून ठेवावेत आणि सकाळी गवताच्या ढीगाखाली जमा झालेले वाणी जमा करून मिठाच्या किंवा साबणाच्या द्रावणात टाकावेत. शेतातील आर्द्रता आणि लपण्याची ठिकाणे कमी करून बांधावरील गवत व दगड काढून बांध मोकळा ठेवावा. बऱ्याचदा आर्द्रता, घनदाट पिकात जास्त पाणी दिल्यामुळे किंवा संध्याकाळी पिकात पाणी चालू ठेवल्यास वाणीचा प्रादुर्भाव वाढतो. जास्त आर्द्रता व अन्नाचा पुरवठा नसल्यास काही दिवसातच वाणी मरतात. ज्या ठिकाणी शेतकर्यांनी पेरणीपूर्वी बियाण्याला बीजप्रक्रिया केली आहे तेथे वाणीचा प्रादुर्भाव कमी आढळून आलेला आहे. पिकामध्ये वेळेवर कोळपणी करावी त्यामुळे जमिनीतील अंडी व लपून बसलेल्या वाणी किडी उघड्या पडून नष्ट होतील. चांगला पाऊस पडल्यास या किडींचे नैसर्गिक नियंत्रण होते.

रासायनिक व्यवस्थापन : कीड संपूर्ण शेतात पसरली असल्यास क्लोरोपायरीफॉस १० टक्के दाणेदार किंवा फिप्रोनील ०.३% दाणेदार या यापैकी कोणत्या एका कीटकनाशकाची निवड करून ५ किलो प्रति हेक्टर १०० किलो शेण खतात मिसळून ओळीने शेतातील रोपाजवळ वापर करू शकता. (या कीटकनाशकाचा वापर करण्यापूर्वी स्थानिक तज्ज्ञांचा सल्ला घेऊन लेबल क्लेम शिफारसी प्रमाणेच व लेबल क्लेम शिफारस तपासूनच गरज असेल तरच वापर करावा). कार्बोफ्युरॉन (३ टक्के दाणेदार) किंवा फिप्रोनिल (०.६ टक्के) ४ किलो प्रति १०० किलो शेणखतात मिसळून ओळीने शेतातील रोपा जवळ वापरावा व त्यामध्ये गहू पीठ दीड कप + मध दोन चमचे + कार्बोसल्फान ५० मिली + पाणी अर्धा कप प्रमाणात मिश्रण करावे. मिश्रणाच्या गोळ्या करून पोत्याच्या तुकड्यामध्ये बांधून जमिनीत १५ ते २० ठिकाणी ४ ते ६ इंच खोल गाडाव्यात. थायोडिकार्ब ७५% कीटकनाशक २५० ग्रॅम प्रति एकर अधिक २ ते ३ किलो धान्याचा कोंडा/ लाकडाचा भुसा/कोरडे शेणखत/लाह्या/ मुरमुरे यामध्ये मिसळून प्रादुर्भावग्रस्त प्लॉट मध्ये पसरून द्याव्यात.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक ऑलिम्पिक दिवस
### आंतरराष्ट्रीय विधवा दिन

### महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीची लढाई : 'पलाशी' येथे रॉबर्ट क्लाईवच्या ३,००० सैन्याने सिराज उद्दौलाच्या ५०,००० सैन्याचा फितुरी करवून पराभव केला.
१८६८ : क्रिस्टोफर लॅथम शॉल्स यांना टाईप-राइटर च्या शोधासाठी पेटंट मिळाले.
१८९४ : पॅरिस येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितिची स्थापना झाली.
१९१२ : ऍलन ट्युरिंग, इंग्लिश गणितज्ञ व संगणकशास्त्रज्ञ.
१९२७ : भारतीय नभोवाणी मुंबई येथे सुरु.
१९६० : अमेरिका आणि जापान देशांमध्ये सुरक्षा संबंधी समझोता करण्यात आला.
१९६९ : आय.बी.एम. ने जाहीर केले की जानेवारी १९९७ पासून सॉफ्टवेअर आणि इतर सेवांची किंमत वेगवेगळी होईल त्यामुळे आधुनिक सॉफ्टवेअर उद्योग सुरु झाला.
१९७९ : इंग्लंडला ९२ धावांनी हरवून वेस्ट इंडिजने दुसरा क्रिकेट विश्वकरंडक जिंकला.
१९८५ : दहशतवादी बॉम्बचा एअर इंडियाच्या कनिष्क बोइंग ७४७ विमानात स्फोट. ३२९ ठार.
१९९६ : आवामी लीगच्या शेख हसीना वाजेद यांचा बांगलादेशच्या पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला. या बांगलादेशच्या दुसर्या महिला पंतप्रधान होत.
१९९८ : दुसर्या महायुद्धात जपानच्या शरणागतीची साक्षीदार असलेली 'यू. एस. एस. मिसुरी' ही युद्धनौका निवृत्तीनंतर पर्ल हार्बर बंदरात दाखल झाली.
२०१६ : युनायटेड किंग्डम ने ५२% ते ४८% मतदान होऊन युरोपियन युनियनला सोडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७७ : भारतीय-इंग्लिश अभिनेते नॉर्मन प्रिचर्ड यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑक्टोबर १९२९)
१९०१ : राजेन्द्र नाथ लाहिरी क्रांतिकारक (मृत्यू: १७ डिसेंबर १९२७)
१९०६ : वीर विक्रम शाह 'त्रिभुवन' नेपाळचे राजे (मृत्यू: १३ मार्च १९५५)
१९१६ : सर लिओनार्ड तथा 'लेन' हटन इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: ६ सप्टेंबर १९९०)
१९२९ : पाच वेळेच्या ग्रॅमी पुरस्कार विजेता अमेरिकन गायिका, गीतकार, अभिनेत्री, नर्तक, विनोदकार आणि लेखिका जून कार्टर यांचा जन्मदिन.
१९३४ : राष्ट्रीय एकात्मतासाठी इंदिरा गांधी पुरस्कार, गांधी पीस पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय गांधीवादी पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते तसचं, दशोली ग्राम स्वराज्य संघाचे संस्थापक चंडीप्रसाद भट्ट यांचा जन्मदिन.
१९३४ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी, व हिमाचल प्रदेशाचे माजी (४थे) मुख्यमंत्री वीरभद्र सिंह यांचा जन्मदिन.
१९३५ : मराठी लेखक राम कोलारकर यांचा जन्म.
१९३६ : ग्रीक पंतप्रधान कॉस्टास सिमिटिस यांचा जन्म.
१९४२ : दिग्दर्शक जब्बार पटेल यांचा जन्म. जब्बार रझाक पटेल हे मराठी चित्रपटसृष्टीतील आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शक आहेत. अनेक पैलू असणाऱ्या आंबेडकरांचे जीवन तीन तासाच्या चित्रपटात रेखाटणे ही अवघड बाब असताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील चित्रपट केला. या चित्रपटाने त्यांना अनेक पुरस्कार मिळवून दिले.
१९४८ : नबरुण भट्टाचार्य भारतीय पत्रकार आणि लेखक (निधन: ३१ जुलै २०१४)
१९५२ : राज बब्बर, भारतीय चित्रपट अभिनेते, राजकीय नेते
१९७२ : झिनेदिन झिदान फ्रेन्च फूटबॉलपटू
१९८० : वेस्ट इंडीजचा क्रिकेट खेळाडू रामनरेश सरवण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

७९ : ७९ई.पुर्व: रोमन सम्राट व्हेस्पासियन यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर ०००९)
१७६१ : बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवे यांचे निधन. (जन्म: ८ डिसेंबर १७२१)
१८३६ : स्कॉटिश तत्त्ववेत्ते, इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ जेम्स मिल यांचे निधन. (जन्म: ६ एप्रिल १७७३)
१८९१ : विल्हेल्म एडवर्ड वेबर (छायाचित्र पहा), जर्मन भौतिकशास्त्रज्ञ.
१९१४ : भारतीय गुरु आणि तत्वज्ञ भक्तिविनाडो ठाकूर यांचे निधन. (जन्म: २ सप्टेंबर १८३८)
१९३९ : आधुनिक बालशिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते गिजुभाई बधेका यांचे निधन. (जन्म: १५ नोव्हेंबर १८८५ चितल, अमरेली, गुजराथ)
१९५३ : डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, भारतीय जनसंघाचे संस्थापक, अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ.
१९७५ : जनरल प्राणनाथ थापर, भारताचे भूसेनाप्रमुख. (जन्म: २३ मे १९०६)
१९८० : भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न व्ही. व्ही. गिरी यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १८९४)
१९८० : संजय गांधी, भारतीय राजकारणी (जन्म: १४ डिसेंबर १९४६)
१९८२ : बालगंधर्व आणि मास्टर कृष्णराव यांना ऑर्गनची साथ करणारे गंधर्व नाटकमंडळीतील नामवंत कलाकार हरिभाऊ देशपांडे यांचे निधन.
१९९० : चरित्र अभिनेते हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय यांचे निधन. (जन्म: २ एप्रिल १८९८ हैदराबाद, आंध्र प्रदेश)
१९९४ : नाटककार, साहित्यिक वसंतशांताराम देसाई यांचे निधन.
१९९५ : पोलिओची लस शोधणारे शास्त्रज्ञ डॉ. जोनस सॉक यांचे निधन.
१९९६ : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू रे लिंडवॉल यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९२१)
२००५ : साहित्यिक डॉ. हे. वि. इनामदार यांचे निधन.
२०१५ : भारतीय नन, वकील, आणि समाजसेवक निर्मला जोशी यांचे निधन. (जन्म: २३ जुलै १९३४)
२०२० : निलंबर देव शर्मा डोंगरी भाषेतील साहित्याबद्दल इंग्रजीतील पहिले प्रकाशन केलेले लेखक पद्मश्री (जन्म: ६ ऑक्टोबर १९३१)

# सत्तेच्या दबावाखाली चुकीचे दाखले दिले आहेत का?

## मुंबईत ओबीसी नेत्यांची बैठक ; पंकजा मुंडे यांची मागणी



सत्तेचा गैरवापर करुन किंवा दबावाखाली चुकीचे सर्टिफिकेट दिले गेले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करावी, तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही याबद्दलची स्पष्टता करावी अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज ट्विटद्वारे सरकारकडे केली.सहयाद्री अतिथीगृहात आज राज्यातील प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक सरकारने बोलावली होती. वडीगोद्री येथे सुरू असलेल्या आंदोलना संदर्भात ही बैठक होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, पंकजा मुंडे यांच्यासह प्रमुख नेते यावेळी उपस्थित होते.

लक्ष्मण हाके यांनी सुरू केलेल्या उपोषणा संदर्भात पंकजा मुंडे यांनी ट्विट करत सरकारकडे मागणी केली आहे ,त्या म्हणाल्या, राज्यातील काही महत्वाच्या नेत्यांचे शिष्टमंडळ हे लक्ष्मण हाके यांना वडीगोद्री येथे जाऊन भेटल्याचे समजते. ते योग्यच आहे. हाकेंचे उपोषण हे त्यांचे नसून हा कायद्याच्या चौकटीत सर्वांना समान न्याय देण्यासंदर्भातील भूमिका आहे. सत्तेचा गैरवापर करुन किंवा दबावाखाली चुकीचे सर्टिफिकेट दिले गेले आहेत का? असल्यास त्याची चौकशी करावी, तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का कसा लागत नाही याबद्दलची स्पष्टता करावी. या साध्या त्यांच्या दोन मागण्या इतर मागण्यांसमवेत आहेत. शिष्टमंडळाने उपोषणास भेट दिली असली तरी राज्याच्या प्रमुखांनी तिथे जाऊन भेट द्यावी, म्हणजे या समस्त राज्यातील बहुजनांना सन्मान दिल्यासारखे होईल असं त्या म्हणाल्या.

## थोडक्यात



### तुलसी महाविद्यालयात योग दिन साजरा


बीड : येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे शुक्रवार दि २१ जून रोजी सकाळी ७ वाजता आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.एम.एम.थोरात, आर्ट ऑफ लिव्हिंगचे योग प्रशिक्षक अभिमन्यू महानोर व त्यांचे सहकारी रुद्र उपरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी योग शिक्षक अभिमन्यू महानोर यांनी विविध योगासने व प्राणायम याबाबत उपयुक्त माहिती दिली; तसेच योगासनांची प्रात्यक्षिक करून दाखवित उपस्थितांकडून करवूनही घेतली. कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेश कसबे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### कालिकादेवीच्या विद्यार्थ्यांची निवड



शिरूर : दिनांक २२/ ६ २०२४- येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील वाघमारे सचिन रामदास या विद्यार्थिनीची प्रोबेशनरी ऑफिसर इन सेंट्रल बँक ऑफ इंडिया पदावर निवड झाली आहे. तसेच साळवे संग्राम संजय या विद्यार्थ्यांची आयसीआयसीआय या बँकेमध्ये असिस्टंट मॅनेजर या पदावर निवड करण्यात आली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर येवले डॉ.गणेश आडगावकर , डॉ. धम्मपाल घुबरे, डॉ. नवनाथ पवळे डॉ.संजय सावते यांनीही या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### महिला काँग्रेसच्या वतीने वृक्षारोपण



बीड : राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्ष जिल्हा बीडच्या वतीने शुक्रवारी वटसावित्री सणाचे औचित्य साधून मानवी जीवनासाठी वृक्ष लागवड करणे हे खुप आवश्यक असून जास्तीत जास्त वृक्षारोपण करणे पुढील अनेक पिंढ्यासाठी महत्वाचे आहे हा संदेश या सणाच्या निमित्ताने प्रत्येक घरोघरी जावा प्रत्येक ताईने एक तरी वृक्ष लावावा यासाठी झाडे लावा झाडे जगवा'' या संकल्पनेतून वटपौर्णिमेच्या निमित्ताने बीड येथे महिला प्रदेशाध्यक्ष आदरणीय रूपालीताई चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे वार्ड क्रमांक चोवीस, नाथ सृष्टी कॉलनी, अंकुश नगर बीड येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्षा प्रज्ञाताई खोसरे, जिल्हा कार्याध्यक्षा शालिनीताई परदेशी, शहर सचिव सुजाता कांबळे, कोमल राजपूत, नीता कांबळे, अनुराधा प्रकाश, अर्चनाताई देशमुख, श्रद्धा क्षीरसागर, इत्यादी महिला पदाधिकारी, सदस्य उपस्थित होत्या.

### तुलसी इंग्लिश स्कूल येथे योग दिन

बीड :येथील देवगिरी प्रतिष्ठान बीड संचलित तुलसी इंग्लिश स्कूल,बीड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन दि २१ जून रोजी



उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शाळेच्या प्राचार्या सौ.उमा जगतकर,योगा टीचर जयश्री पवार यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी योग प्रशिक्षणाचे प्रयोग करत त्याचे महत्त्व जाणून घेतले तसेच निरोगी आयुष्य जगण्यासाठी योग प्राणायाम आवश्यक आहे याची माहिती यावेळी यांना देण्यात आली.

# तलाठी कार्यालय व निवासस्थानाच्या इमारती बेवारस सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

## तलाठी कार्यालय शोधता शोधता शेतकऱ्यांची होतय दमछाक

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकऱ्यांना महसुली सुविधा आपल्या गावातच सुरळीत मिळाव्यात शेतकऱ्याच्या वेळ व आर्थिक बचत व्हावी या उद्देशाने तालुक्यामध्ये शासनाने लाखो रुपये खर्चून तलाठी सज्जाच्या इमारतिचे बांधकाम केले आहेत परंतु मागील अनेक वर्षापासून या इमारती मध्ये तलाठी कार्यालय सुरूच झाली नाहीत. दहा ते बारा वर्षापासून या इमारती वापरा अभावी बेवारस पडल्या आहेत याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग महसूल विभाग व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष केल्याचे दिसते. याचा नाहक त्रास तालुक्यातील शेतकऱ्यांना सहन करावा लागतो.

अंजनडोह , आंबेवडगाव, तांदरवाडी आदी ठिकाणच्या तलाठी सज्जाच्या इमारती वापरा अभावी पडून आहेत या इमारती वापरात नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर इमारतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे . सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे या इमारती जमीन दोस्त होण्याच्या मार्गावर आहेत.

शासनाने लाखो रुपये खर्च करून तलाठी कार्यालय व निवासस्थाने उभारली आहेत ती कोणाच्या च वापरात नाहीत .या कार्यालयातून तलाठी कामकाज सुरू करावे अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करत आहेत. शेतकऱ्यांना तलाठी कार्यालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा त्यांच्याच गावात मिळाव्यात या उद्देशाने तलाठी सज्जाच्या ठिकाणी इमारतीचे कामे केली होती शासनाच्या या धोरणाचा बोजवारा उडाला आहे.

तलाठी सज्जांवर शेतकऱ्यांना सुविधा मिळत नाहीत तलाठ्याकडील कामासाठी शेतकऱ्यांना धारूर शहरामध्ये येऊन तलाठी कार्यालय शोधावी लागतात यामध्ये शेतकऱ्यांचे आर्थिक व वेळेचेही नुकसान होत आहे शेतकऱ्यांची होणारी फरफट थांबावी याकडे प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन तलाठी सज्जाच्या उभारलेल्या इमारती मधून तलाठी कार्यालय सुरळीत सुरू व्हावीत अशी मागणी शेतकरी व तालुक्यातील नागरिक करत आहेत .




आमच्या गावामध्ये तलाठी कार्यालय व निवासस्थानाची इमारत बांधून बरेच वर्ष झाले तरी त्या इमारतीमध्ये कार्यालय सुरू झाले नाही त्यामुळे आम्हाला शेतातील कामे सोडून धारूर शहरात असणार्या तलाठी कार्यालय जाऊन कामे करावी लागत आहेत त्यामुळे आमचे आर्थिक नुकसन होते ते वेगळेच व वेळेचेही नुकसान होते आमच्या गावातील तलाठी कार्यालय लवकरात लवकर सुरू करा.
-प्रमोद सोळंके शेतकरी अंजनडोह

लवकरच सर्व तलाठ्यांची बैठक घेऊन तलाठी कार्यालय व निवासस्थानाच्या इमारतीचा आढावा घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ही त्या बाबतची माहिती घेतली जाईल.
-प्रकाश गोपड,नायब तहसीलदार धारूर

# कुलरचा शॉक लागल्याने चिमुरड्याचा मृत्यू

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील पत्रकार संतोष स्वामी यांचा पुतण्या स्वराज राजेश स्वामी (वय १० वर्ष) याला कुलरचा शॉक लागल्याने त्याचे दुःखद निधन झाले. शॉक लागताच स्वराजला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले,मात्र डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. चुणचुणीत व सर्वांचा लाडका असलेल्या या गोड मुलाच्या अकाली जाण्याने दिंद्रूड गावावर शोककळा पसरली.



दि. २० जून गुरुवारी शाळा सुटल्यानंतर घरी आलेल्या स्वराज ने ग्लास मधील रस पिऊन ग्लास कूलर वर ठेवला. लोखंडी कुलरमध्ये विज प्रवाह असल्याने त्यास जबरदस्त शॉक लागून तो खाली पडला. घरातील नातेवाईकांच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी तातडीने त्यास गावातील दवाखान्यात आणले. त्याचे शरीर साथ देत नसल्याने स्थानिक डॉक्टरांनी पुढे जाण्यास सांगितले. मात्र माजलगाव येथील एका खासगी हॉस्पीटल मध्ये येण्याअगोदरच रस्त्यात स्वराज ने आपले प्राण सोडल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दिंद्रुड पंचक्रोशीत ही घटना वाऱ्यासारखी पसरताच सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती. सतत हसतमुख असणारा स्वराज ने जगाचा निरोप घेतल्याचे समजताच कुटूंबातील व्यक्तींच्या दुःखाला पारावार उरला नाही. यावेळी गावात शोककळा पसरली होती. काल गुरुवारी रात्री साडेनऊ वाजता स्वराजच्या पार्थिवावर दुःखद वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. आजी-आजोबा, आई-वडिल, चुलता-चुलती, बहिण, भाऊ ,आत्या आदी नातेवाईकांचा जीव की प्राण असलेल्या स्वराजच्या जाण्याने स्वामी परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला.

# बीसीए, बीसीएस प्रवेशासाठी तुलसी महाविद्यालयाची २५ जून रोजी सीईटी

बीड । प्रतिनिधी

बीसीए, बीसीएस या संगणकाशी संबंधित असलेल्या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. बीड शहरातील तुलसी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयांमध्ये या अभ्यासक्रमांचे प्रवेश प्रक्रिया सुरू असून २५ जून रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड यांच्या वतीने सीईटी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांना बीसीए, बीसीएस कोर्ससाठी प्रवेश घ्यायचे आहेत त्यांनी महाविद्यालयात येऊन ऑनलाईन पद्धतीने आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन प्राचार्य डॉ.एल.एम थोरात यांनी केले आहे.गेल्या वर्षी क्षमतेच्या तीन ते चार पट अधिक विद्यार्थ्यांनी बीसीएस या कोर्स करिता प्रवेश मिळवण्यासाठी नोंदणी केली होती. त्यामुळे तुलसी महाविद्यालयाच्या वतीने चाळणी परीक्षा घेऊन या अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये यंदा १५ जूनपासून प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. सद्या संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान संबंधित अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. तुलसी महाविद्यालयामध्ये शहरी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची बीसीए, बीसीएस या अभ्यासक्रमा विषयी सर्वाधिक विचारणा होत असून सुरुवातीच्या काही दिवसांतच या अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी वाढत आहे. तुलसी महाविद्यालयात बीसीए, बीसीएस १८० जागा आहेत. यावर्षी बीसीए, बीसीएस कोर्ससाठी सीईटी परीक्षा बंधनकारक केली आहे. सीईटी दिल्याशिवाय विद्यार्थ्यांना बीसीए, बीसीएस या कोर्ससाठी प्रवेश घेता येणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायचे आहेत त्यांनी लवकरात लवकर महाविद्यालयात येऊन ऑनलाईन पद्धतीने आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन तुलसी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीडचे प्राचार्य डॉ.एल.एम.थोरात यांनी केले आहे.

# पोलीस भरती,फाउंडेशन बॅच मोफत कार्यशाळा

बीड । प्रतिनिधी

निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे पोलीस भरती , सरळ सेवा व इतर स्पर्धा परीक्षांसाठी मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा अॅचीवमन्ट अॅकॅडमी , लोटस हॉस्पिटल समोर , यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाजवळ बीड येथे दि. २४ जून ते ५ जुलै या कालावधीत सकाळी १० ( दहा ) वाजता होणार आहे. या कार्यशाळेत पोलीस भरती, तलाठी , सरळ सेवा व इतर स्पर्धा परीक्षांसाठी निर्धारित केलेले घटक विषय गणित, बुद्धिमापन चाचणी, इंग्रजी व्याकरण , मराठी व्याकरण , सामान्य ज्ञान व चालू घडामोडी या घटक विषयांची तयारी करून घेतली जाणार आहे .

तसेच विद्यार्थ्यांना अवघड वाटणारा गणित या घटक विषयातील कोणत्याही टॉपिकवर पडणारे प्रश्न कमी वेळात कसे सोडवावे याविषयी मार्गदर्शन केले जाणार आहे. दिवसेंदिवस स्पर्धा परीक्षांचे स्वरूप बदलत असून प्रश्नांची काठीन्य पातळी वाढत आहे . पहिल्याच प्रयत्नात यश मिळवण्यासाठी प्रत्येक घटक विषयाचा अभ्यास कसा करावा हे समजावून सांगितले जाणार आहे. बारा दिवस मोफत चालणाऱ्या या कार्यशाळेत विविध स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तके लिहिणारे लेखक डॉ. नंदकुमार उघाडे प्रा. ज्योती शिनगारे यांच्यासह तज्ञ व अनुभवी प्राध्यापक मोफत कार्यशाळेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षाभिमुख मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी या क्रमांकावर संपर्क साधावा. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी या मोफत कार्यशाळेचा लाभ घ्यावा . असे आवाहन निलज्योती सेवाभावी संस्थेचे सचिव डॉ. नंदकुमार उघाडे यांनी केले आहे.

# योग साधनेतून डायबिटीसवर नियंत्रण मिळवता येते - डॉ.सारडा

बीड । प्रतिनिधी

जगातील प्रत्येक व्यक्तीला कामाचा ताण असून मानसिक तणावामुळे अनेकांना डायबिटीस (शुगर) हा आजार होवू शकतो. डायबिटीस आजाराचे दोन प्रकार असून केवळ नियमित व्यायाम, योग साधनेतून शुगर सारख्या आजारांवर नियंत्रण मिळवता येवू शकते. शुगरच्या रुग्णांना भुक, तहान खुप लागणे तसेच वजन कमी होणे हे या आजाराची प्रमुख लक्षणे असून अनावश्यक चिंता, ताण- तणावामुळे शुगरचा आजार अनेक पटीने वाढू शकतो. योग साधनेतून डायबिटीस (शुगर) या आजारावर नियंत्रण मिळवता येवू शकते असे योगप्रशिक्षक डॉ.राजेंद्र सारडा यांनी तर प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत योग साधना, प्राणायामास खुप महत्व असून आहार, विहार संस्कृती बदलत असल्यामुळे मधुमेह, दमा, कर्करोग यासह विविध आजार मोठ्या प्रमाणात वाढत असून आजारांना नियंत्रित करण्याचे काम योग साधनेतून होत असते. उत्तम आरोग्य, आदर्श जीवन शैली जगण्याचे माध्यम म्हणून योग साधनेकडे पाहिले जाते. योग साधना प्रत्येकाने नियमित अंमलात आणली तर अनेक व्याधीपासून मुक्त राहता येऊ शकते. निरोगी राहण्यासाठी नियमितपणे रोजच्या दिनचर्येत योगसाधना महत्वाची असल्याचे प्रतिपादन योग प्रशिक्षक जितेंद्र बोरा यांनी व्यक्त केले.

शुक्रवार दि.२१ रोजी जागतिक योग दिनाचे औचित्य साधून दीपमाळ योगा मित्र मंडळाच्या वतीने योगाभ्यास, ध्यानधारणा, सुर्यनमस्कार आदींसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन, योग गीताने करण्यात आली. याप्रसंगी पेठ बीड पोलीस स्टेशनचे पी.आय. मुदीराज साहेब, संपादक विजयराज बंब, सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड, सि.ए.गोपाल कासट, जयसिंग मामा चुंगडे, मदन दुगड, डॉ . डॉ.शिवप्रसाद जाजु, अशोक शेटे, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजु वंजारे, संचालक अभिजीत वैद्य आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.सारडा म्हणाले की उत्तम आरोग्याचा महामंत्र म्हणजे नियमित योग साधना, प्राणायाम आहे. प्राचीन काळापासून योग साधना ही थोर ऋषी, मुनींनी दिलेली महान देणगी जगाला दिली. ज्याचे प्राणावर नियंत्रण त्याला मनावर नियंत्रण मिळविता येते. त्यासाठी योगसाधना उत्तम साधन आहे. ऋषी- मुनींच्या प्राचिण काळापासून योगसाधना भारतात केली जात असून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी जगभर योग साधना पोहोचविण्याचे कार्य केले. मधुमेहाच्या आजारामुळे देशात कोट्यावधी लोक त्रस्त असून या जटील आजारावर विविध प्रकारची औषधी उपलब्ध असतानाही तो कायम नष्ट होत नाही तर त्यासाठी योगसाधनेच्या माध्यमातून नियंत्रण मिळवता येवू शकते असे त्यांनी यावेळी सांगितले.

# ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळयाची परळीत सांगता

## केशव महाराज उखळीकर यांच्या काल्याचे किर्तन

परळी । प्रतिनिधी

'ज्ञानोबा तुकाराम'चा अखंड जयघोष, टाळ मृदुंगाचा गजर, मंदिरातील विविध रंगी फुलांच्या माळांची सजावट, रस्त्यावर काढलेल्या रांगोळीच्या पायघड्यांवरून हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये गावातून संत ज्ञानेश्वर महाराज चाकरडीकर जयघोष आज करण्यात आला. कीर्तनकारांच्या प्रबोधनाने वातावरण मंत्रमुग्ध झाले होते. काल्याच्या कीर्तनानंतर दहीहंडी फोडून महाप्रसाद देण्यात आला. त्यानंतर सात दिवसांच्या अखंड हरीनाम सप्ताहाची मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली.

परळी वैजनाथ येथील मोंढा मार्केट भागातील श्री संकटमोचन हनुमान मंदिर येथे १५ जुन पासून सुरू असलेल्या आडत व खरेदीदार व्यापारी महासंघ व अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली २० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरीनाम साप्ताह, श्रीमद्? भागवत कथा व भव्य कीर्तन सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. आडत व्यापारी व खरेदीदार व्यापारी यांच्या हस्ते कलश आणि वीणा पूजन करून सप्ताहास सुरुवात करण्याताली. पहाटे संकटमोचन हनुमान मूर्तीची महापूजा करून , काकडा आरती, सकाळी शाम मंत्री व सहकारी यांच्या उपस्थितीत सुंदरकांड वाचन, नंतर हरिपाठ व महिलांचे सामुक विविध महिला भजनी मंडळाचे भजने भागवताचार्य गोविंद महाराज नंदनजकर यांच्या अमृतमैयवाणीतुन कथा संपन्न झाली रात्री ७ते९ या वेळेत कीर्तन विविध महाराज मंडळीचे किर्तन संपन्न झाले. पहिल्या दिवसापासून विनोदाचार्य माणिक महाराज रेंगे, विनोद सम्राट प्रकाश महाराज साठे, भागवताचार्य नामदेव महाराज फपाळ, बालकीर्तनकार जनाई महाराज कोकाटे संगमकर, गणेशानंद महाराज शास्त्री भगवतीकर, विनोदाचार्य भरत महाराज जोगी यांनी कीर्तन वारकरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष केशव महाराज उखळीकर यांनी काल्याचे किर्तन सेवा केली. कन्हैय्या अध्यात्मिक वारकरी वारकरी शिक्षण संस्थचे अध्यक्ष भागवताचार्य गोविंद महाराज मुंडे यांनी आपल्या रसाळ व ओजस्वी वाणीतून कथा सांगितली आहे.



शुक्रवारी दुपारी फुलांनी सजविलेल्या पालखीतून संत माऊली महाराज यांच्या प्रतिमेची टाळ मृदुंगाच्या गजरात मंदिर प्रदक्षिणा करण्यात आली. यावेळी महिलांनी रांगोळीच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. तसेच दहीहंडी फोडून उपस्थित भाविकांना महाप्रसाद देवून सांगता करण्यात आली. सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन सोहळयास परळी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी उपस्थिती लावली होती. महिलांनी सादर केलेल्या भजनाने भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले होते. संकटमोचन हनुमान मंदिर मोंढा मार्केट येथे गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या विसाव्या शतकातील महान संत ह भ प श्री ज्ञानोबा माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह श्रीमद्? भागवत कथा व कीर्तन सोहळ्यातील महिला भजनी मंडळ अ.भा. वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह. भ. प. श्री रामेश्वर महाराज कोकाटे व परळी विविध व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड यांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहे. सप्ताहास विविध महाराज मंडळीची व मान्यवरांची उपस्थिती सर्व आडत व्यापरी व खरेदीदार व्यापा-यांचे व संकटमोचन हनुमान मंदीर कमिटीचे आभार रामेश्वर महाराज कोकाटे यांनी मानले

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या फेरफार नोंदी गायब

## सातबारावर असलेले फेरफार क्रमांक चुकीचे ,फेरफार नंबर असतो एक आणि सापडतो दुसराच

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांचे दस्ताऐवज अपडेट करण्यासाठी केंद्र सरकारने बीड जिल्ह्याची निवड केली आणि काम उत्कृष्ट झाले म्हणून महसूल प्रशासनाने स्वतःची पाठ थोपटून घेतली .मात्र आजही अनेक शेतकऱ्यांचे फेरफार एकतर सापडतच नाहीत आणि सापडले तर ते चुकीचे असतात. सातबारावर जो फेरफार क्रमांक असतो त्या क्रमांकावर दुसराच कुठलातरी फेरफार सापडतो. यामुळे शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत असून बँक वाले ही पीक कर्जासाठी शेतकर्यांची अडवणुक करताना दिसत आहेत .या सर्व बाबीकडे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी गांभीर्याने लक्ष देऊन हे दस्ताऐवज अद्यावत करावेत अशी मागणी

### बँकांकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

**शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना फेरफार मागू नयेत असे आदेश असतानाही फेरफार असल्याशिवाय आम्ही कर्ज देणार नाही अशी भूमिका बँकांची आहे जर बँक जिल्हाधिकाऱ्यांना मोजत नसेल तर यापेक्षा गंभीर बाब काय असावी**

शेतकरी करत आहेत .दोन महिन्यात अभियान राबवून नेमके तलाठ्यांनी काय काम केले आहे.हा मोठा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

सन २०१० नंतरच्या नोंदी झाल्या तेवढ्याच नोंदी अद्यावत करण्यात आल्या यापूर्वीचे अभिलेखे तसेच ठेवण्यात आले. ज्यांच्या वडिलोपार्जित जमीनी आहेत आणि वर्षानुवर्षी ते जमीनी कसतात. त्यांचे फेरफार ना रेकॉर्ड रुमला सापडतात, ना तलाठ्याकडे सापडतात तलाठ्याकडे गेले तर ते सांगतात रेकॉर्ड रूममध्ये मिळतील. रेकॉर्डमध्ये सांगतात हे फेरफार सापडतच नाहीत.असे सांगितले जाते. सातबारावर जे फेरफार क्रमांक दिलेले आहेत तेही चुकीचे आहेत. या क्रमांकावर फेरफार शोधायला लागले तर तिसऱ्याच व्यक्तीचे फेरफार सापडतात. मध्यंतरीच्या काळामध्ये केंद्र सरकारच्या वतीने शेतकऱ्यांचे अभिलेखे अद्यावत करून ते डिजिटल करण्यासाठी अभियान राबवण्यात आले. महाराष्ट्रामध्ये दोन जिल्ह्याचा समावेश झाला. त्यात बीड जिल्ह्याचा क्रमांक होता ही एक चांगली गोष्ट होती .मात्र हे अभियान राबवतांना तलाठी आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी नेमके काय काम केले. हे अद्यापही न उलगडलेले कोडे आहे. यावेळी जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी सर्व कामे अद्यावत केलेले असल्याचे सांगून जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांच्याकडून पाठ थोपटून घेतली. मात्र प्रत्यक्षात हा सर्व दिखावा होता. हे स्पष्ट झाले आहे कर्मचाऱ्यांकडून जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांची दिशाभूल केली जात असून काहीच न काम करता आम्ही सर्व अद्यावत केले आहे. असे सांगून वाहवा मिळवली. मात्र आता हळूहळू कुठलेच काम झालेले नाही हे स्पष्ट होत असून शेतकऱ्यांची अडचण सोडवण्यासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक बाबीकडे जातीने लक्ष घालणे गरजेचे आहे. पूर्वीच्या काळी बँकांनी फेरफार मागू नयेत असे आदेश देण्यात आले होते. मात्र बँक वाले आजही फेरफाराची नक्कल असल्याशिवाय पीक कर्ज देतच नाहीत .शेतकऱ्यांची इथेही बँक वाल्याकडून अडवणुक होत असून याकडेही जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे .अनेक शेतकरी केवळ फेरफार नक्कल नसल्यामुळे पीक कर्जापासून वंचित राहिलेले दिसत आहेत. जर फेरफारच नाही मिळाला तर त्याला कर्जत मिळणार नाही. आणि कर्ज नाही मिळाले तर त्याची पेरणी कशी होणार .असे अनेक प्रश्न यामुळे उपस्थित होत असून जिल्हाधिकारी महोदयांनी या गंभीर प्रश्नाकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.

### अनेकांचे फेरफार गायब आहेत

ज्यांच्या वडिलोपार्जित जमिनी आहेत. त्यांचे फेरफार कुठेही सापडत नाहीत. ना रेकॉर्डरुममध्ये ना तलाठ्याकडे हे अभियान राबवताना जे तलाठी कार्यरत होते. त्यांच्या आता बदल्या झाल्या. आता नवीन तलाठी आल्याने याबद्दल आम्हाला काही माहिती नाही असे सांगून ते मोकळे होतात. मग याला नेमके कोण जबाबदार आहे. असा प्रश्न शेतकऱ्यांनाही पडू लागला आहे.

### फेरफार नेमके कोणी ऑनलाईन केले?

फेरफार ऑनलाईन करण्याची जबाबदारी प्रत्येक सज्जाच्या तलाठ्याची होती. मात्र अनेकांना हे काम येतच नसल्याने त्यांनी खाजगी व्यक्तीला हे काम दिले होते. त्यांनी नेमके कसे काम केले आणि तलाठ्यांना त्याचे गांभीर्य किती होते हा मोठाच प्रश्न आहे.

## श्रीमती गोदावरी कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेत योग दिन साजरा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

योग दिनाचे औचित्य साधून गोदावरी बाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेत योगाचे आयोजन करण्यात आले .१२०० पेक्षा अधिक विद्यार्थिनी शाळेतील शिक्षक, शिक्षिका यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रीडा शिक्षिका अंजली रेवडकर यांनी मुलींना योगा विषयीची माहिती सांगून योगाचे महत्त्व विशद केले. योग दिनाच्या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका मीना कुलकर्णी ,उपमुख्याध्यापिका ज्योती चव्हाण , पर्यवेक्षिका स्मिता धावडकर तसेच शिक्षक प्रतिनिधी जिजा गवळे व देवनंदा सोनार यांची विशेष उपस्थिती होती. योगदिनाचे औचित्य साधून मुलींनी व सर्व शिक्षक शिक्षकांनी योगासने , प्राणायाम व सूर्यनमस्कार यांची प्रात्यक्षिके केली.

## धारूर येथील चोरी झालेले एटीएम जायकोवाडीत सापडले

माजलगाव । प्रतिनिधी

धारूर शहरातून चोरट्यांनी दि २२ जुन शनिवार रोजी मध्यरात्री पळवलेले स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे ए.टी.एम. माजलगाव तालुक्यातील जायकोच्यावाडीत पहाटे आढळून आले.दरम्यान धारूर, माजलगाव ग्रामीण पोलिसांच्या पथकासह स्टेट बँक ऑफ इंडियाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आहेत.ए.टी.एम. पळवण्यासाठी वापरलेले वाहन पोलिसांना घटनास्थळी निदर्शनास आले असून ए.

टी.एम.मध्ये २० लाख रुपये रक्कम असल्याची माहिती आहे.

धारूर माजलगाव राष्ट्रीय महामार्गा लगत भारतीय स्टेट बँकेची शाखा कार्यान्वित आहे.या शाखेच्या समोरील बाजूला बँकेचे ए.टी.एम.मागील






**पोलीस पथकासह स्टेट बँक ऑफ इंडियाचे अधिकारी घटनास्थळी दाखल; ए.टी.एम मध्ये २० लाखांची होती रक्कम**

अनेक वर्षापासून उभा करण्यात आलेले आहे.दि २२ जुन शनिवार रोजी पहाटे पूर्वीच सदरील ए.टी.एम.एका पिकअपच्या साह्याने चोरट्यांनी पळवले.त्यामुळे

ए.टी.एम. छेडछाडीचा कॉल स्टेट बँक ऑफ इंडियाला गेला. स्टेट बँक ऑफ इंडियाने तातडीने पोलीस मुख्यालयास याची माहिती दिली. धारूर पोलिसांनी जी.पी.एस.च्या साह्याने ए.टी.एम.चा शोध घेतला.ते ए.टी.एम. माजलगाव तालुक्यातील जायकोवाडी येथे एका बंद पडलेल्या ढाब्यात आढळून आले.दरम्यान धारूर पोलिसांनी माजलगाव ग्रामीण पोलिसांच्या मदतीने घटनास्थळी सकाळी भेट दिली. यावेळी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे कर्मचारीही उपस्थित होते.स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांच्या ◀◀ पान ३ वर

## अंबाजोगाईच्या शासकीय संमिश्र केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंध, मूकबधिर व अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यां साठी मिश्र गट संकुल असलेल्या अंबाजोगाई येथील शासकीय बहुउद्देशीय संमिश्र दिव्यांग केंद्रात इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे प्रवेश घेऊन दिव्यांग विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल घडवावे. असे आवाहन अधीक्षक (वर्ग २) श्रीम. आर एस . मोरे यांनी केले आहे.

अंबाजोगाई येथील शासकीय बहुउद्देशीय संमिश्र दिव्यांग केंद्र हे शासकीय संस्था १९७५ साली स्थापन झालेली असून अंध, मूकबधिर व अस्थिव्यंग या तिन्ही प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांना एकाच छताखाली विशेष शिक्षण व एकात्म शिक्षण देणारी मराठवाड्यातील संमिश्र स्वरूपाची म्हणजेच मिश्रगट संकुल असणारी निवासी एकमेव शासकीय संस्था आहे.

या संस्थेत वरील तिन्ही प्रवर्गातील दिव्यांग मुलांना विशेष शिक्षण, एकात्म शिक्षण देऊन त्यांच्या पुनर्वसनाची देखील काळजी घेतली जाते. त्याचबरोबर डिजिटल शिक्षण, वसती गृहातील परिपूर्ण सुविधा, प्रवेशित मुलांचा सर्वांगीण विकास याबाबतीत विशेष लक्ष दिले जाते. भौतिक उपचार, व्यवसाय उपचार, समाज उपचार, वैद्यकीय उपचार, आवश्यक ते समुपदेशन आदी सुविधा या संमिश्र केंद्रामार्फत प्रवेशार्थी दिव्यांगांना दिल्या जातात. वय वर्ष १८ पर्यंत या शासकीय दिव्यांग संस्थेत अंध ,मूकबधिर ◀◀ पान ३ वर

## आ.नमीता मुंदडा जलजिवनच्या कामात खोट दाखवा

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे जलजिवनच्या कामाची चौकशी आमदारा नमीता मुंदडा यांनी विधान भवनात माडली आहे तरी आमदारा नमीता मुंदडा यांनी विधान भवनात तारांकीत प्रश्न म्हणुन मांडलेली तक्रार खोटी आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे कारण चिंचोली माळी येथे जलजिवनचे काम अगदी योग्य रित्या झाले असुन सुद्धा आमदार नमीता मुंदडा यांनी राजकारणी विरोध म्हणून चिंचोली माळी येथील जलजिवनच्या कामाची तक्रार तारांकीत प्रश्न म्हणुन विधीमंडळात उपस्थित केला आहे तरी आमदारा नमीता मुंदडा



यांनी तक्रार केल्यामुळे आज चिंचोली माळी येथील नागरिक पाण्याविना त्रस्त झाले आहेत कारण आमदारा नमीता मुंदडा यांनी केलेल्या तक्रारी मुळे जलजिवनचे काम बंद झाले तसेच गावातील नागरिकांना पाणी मिळत नाही तरी आमदारा नमीता मुंदडा यांनी चिंचोली माळी गावाची गरज यापुढे कधी पडणार नाही का कारण चिंचोली माळी ग्रामपंचायतच्या तीन तक्रारी करणाऱ्या पहील्या आमदारा



नमीता मुंदडा आहेत त्यामुळे त्यांना चिंचोली माळी येथील रोहन गलांडे पाटील यांनी ५१ रूपये बक्षीस देण्यात येईल असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे रोहन गलांडे पाटील यांनी असे सुध्दा म्हटले आहे की आमदारा नमीता मुंदडा यांचा कोट्यवधी रुपयाचा घोटाळा असताना देखील ऐका ग्रामपंचायतची तक्रार विधीमंडळात मांडण्यात येत आहे यांचा अर्थ असा आहे की आमदार ◀◀ पान ३ वर

## ॲड.रिजवान शेख यांना समाज सेवा राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील सामाजिक कार्यकर्ते ॲड रिजवान शेख हे गेल्या १० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रांमध्ये कार्यरत असून अनेक सामाजिक व विद्यार्थी, युवक,गोरगरीब सर्वसामान्यांच्या, विविध घटकांतील प्रश्न वेळोवेळी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याने त्यांना सामाजिक कार्यात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने रविवार दि २३ जून रोजी आयोजित शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त महाराष्ट्र स्वाभिमान गौरव समाज सेवा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती



**रविवारी मुंबईत होणार मान्यवरांच्या उपस्थितीत वितरण सोहळा**

अध्यक्ष प्रकाश जाधव व सचिव सुरज भोईर यांनी दिली.

मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त ◀◀ पान ३ वर

## रोटरी क्लबच्या 'लेक माझी भाग्याची' उपक्रमांतर्गत वर्षेभरात ५७० मातांचा सन्मान

अंबाजोगाई प्रतिनिधी

मुलीला जन्म दिलेल्या मातेचा बेबीकिट देवून सन्मान करत 'लेक माझी भाग्याची' या उपक्रमातर्गंत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील स्त्री-रोग व प्रसुती विभागात मुलीला जन्म दिलेल्या ५७० मातांचा सन्मान या वर्षेभरात केला.

येथील स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे स्त्री-रोग व प्रसुती विभागाचे प्रमुख डॉ.गणेश तोंडगे, सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ.नितीन चाटे, रोटरीचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव




गणेश राऊत, मनिषा प्रदिप झरकर, डॉ.आदिती झरकर, कोमल परदेशी, अंजली चरखा, सुवर्णा गंगणे, रमेश देशमुख, जगदीश जाजू, कल्याण काळे, स्वरूपा कुलकर्णी, प्रदिप झरकर यांची उपस्थित होती.

यावेळी बोलताना अधिष्ठाता डॉ.धपाटे म्हणाले की, रोटरी क्लबने प्रत्येक महिन्यात मुलीला जन्म दिलेल्या मातांचा सन्मान करून स्त्री-जन्माचे स्वागत केले. ही बाब सामाजिक दृष्ट्या गौरवास्पद आहे. मुलगा- मुलगी असा भेदभाव न करता समानता बाळगावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मुलींना जन्म देणार्या मातांचा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्नील परदेशी यांनी केले. संचलन स्वरूपा कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार गणेश देशमुख यांनी मानले.

## विकासाच्या नावाखाली परळी वैजनाथ शहर भकास करणारे नगर परिषद प्रशासन कधी जागे होणार? - वैजनाथ कळसकर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शहरातील मध्यवर्ती बाजारपेठ असलेल्या सराफा मार्केटसह शहरातील इतर भागांत नगर पालिकेने विकासाच्या नावाखाली शहर भकास करण्याचे सत्रच नगर परिषद प्रदासनाने सुरू केले आहे. गरज नसताना नाल्यांचे कामे सुरू करून कित्येक महिन्यांपासून नाल्यांचे काम अर्धवट सोडण्यात आले आहे. यानिमित्ताने नगर परिषद फक्त गुत्तेदाराचे पालन पोषण करत असल्याचे दिसत आहे असा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर यांनी केला आहे.

आता निवडणूक संपली आहे आणि आदर्श आचारसंहिता उठली आहे, हे खरे आहे, कोणत्याही



**मुख्याधिकारी, नगररचनाकार यांनी त्वरित कारवाई करावी अन्यथा मनसे करणार तीव्र आंदोलन**

अनुचित घटना टाळण्यासाठी पावसाळ्याशी संबंधित कामे वेळेत पूर्ण करण्यावर संबंधित प्राधिकरणाचे हित लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. बरोबरच, गावातील पावसाच्या नाल्यांची काळजी घेणे आवश्यक आहे, विशेषत: जेथे नाल्यांना स्लॅब कव्हर्सची आवश्यकता असते जेणेकरून बाधित नागरिकांना ओलांडणे सोपे होईल याचा विचार करणे आवश्यक आहे.

आज सराफा बाजारात महिला, आबालवृद्ध आदींना जाणे येणे कठीण झाले आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे धंदे बसले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करता नगर परिषद प्रशासनाने त्वरित नाल्यांचे कामे पूर्ण करावेत जेणेकरून सर्वांची सोय होईल. अन्यथा, नगर परिषद प्रशासनातील मुख्याधिकारी असोत किंवा नगर रचनाकार या कामाशी संबंधित सर्वांना त्याच गटारातील घाणीने आंघोळ घालत तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा मनसे शहराध्यक्ष वैजनाथ कळसकर यांनी घटनास्थळी भेट देऊन दिला,याप्रसंगी व्यापाऱ्यांसह मनसैनिक उपस्थित होते.


## शक्तीपीठ महामार्गास तीव्र विरोध

### महामार्ग रद्द अधिसूचना सरकारने काढावी; बाधित शेतकऱ्यांची मागणी

परळी । प्रतिनिधी

पवणार ते पत्रादेवी या शीघ्र दृतगती शक्तिपीठ मार्गास राज्यात शेतकऱ्यांना कडाडून विरोध होत असून राज्य सरकार हा प्रस्तावित महामार्गास स्थगिती दिल्याचे सांगत शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे.स्थगिती नकोय महामार्ग रद्द करण्यात आल्याची अधिसूचना काढण्यात यावी अन्यथा बाधित शेतकरी आपल्या कुटूंबासह हे आंदोलन अधिक तीव्र करतील असा इशारा परळी-अंबाजोगाई येथील बाधित शेतकऱ्यानी सरकारला दिला आहे.

नागपूरपासून गोव्यादरम्यान महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे जोडण्यासाठी, तसेच पर्यटनाला



चालना देण्यासाठी मागणी नसताना देखील समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर आणखी लांब पल्ल्याचा शक्तीपीठ द्रुतगती मार्ग उभारण्याचा निर्णय फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आला होता.राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणाऱ्या या महामार्गाच्या उभारणीस तब्बल ८६ हजार कोटी खर्च येणार असून या महामार्गासाठी २७ हजार एक्कर पेक्षा अधिक शेतजमीन शासन संपादित करणार आहे.नागपूर-रत्नागिरी महामार्ग अस्तित्वात असताना देखील हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचे काम सरकार कडून होत असल्याचे लक्ष्यात येताच राज्यात या महामार्गास तीव्र विरोध होत आहे. मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्ग हा प्रस्तावित असून हा मार्ग अत्यन्त सुपीक आणि बागायती जमिनीतून जाणार आहे. त्यामुळे मराठवड्यातील खूप मोठी बागायत जमीन या महामार्गामध्ये जाऊन शेतकरी कायमचे भूमिहीन होणार आहेत. या शक्तिपीठ महामार्गास शेतकरी विरोध करण्याच्या अनुषंगाने १३ एप्रिल २०२४ रोजी परळी येथे मराठवाड्यातील बाधित शेतकऱ्यांची ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मंत्री मुरलीधर मोहोळ शिवतीर्थवर, पुण्याबाबत राज ठाकरेंनी केलं मार्गदर्शन; पिट्याभाईनेही वेधलं लक्ष

मुंबई । प्रतिनिधी

पुण्याचे नवनिर्वाचित खासदार मुरलीधर मोहोळ यांनी आज मुंबईतील शिवतीर्थ बंगल्यावर जाऊन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी, लोकसभा निवडणुकीत मनसेनं दिलेल्या पाठिंब्याबद्दल मोहोळ यांनी राज ठाकरेंचे आभार मानले. राज ठाकरे यांना पुण्याबद्दल विशेष प्रेम आहे, लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान त्यांनी भविष्यातील पुणे कसं असावं यासंदर्भात जाहीर सभेत भाषण करुन काही अपेक्षाही नेतेमंडळींकडून व्यक्त केल्या होत्या. त्यामुळेच, निवडणूक निकालानंतर मुरलीधर मोहोळ यांनी आज राज ठाकरेंची भेट घेऊन पुण्यासंदर्भात चर्चा केली. तसेच, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक खात्याच्या राज्यमंत्रीपदाची जबाबदारी मोहोळ यांच्याकडे असल्याने त्यांच्या खात्याविषयी चर्चा केली. राज ठाकरेंनी मला मार्गदर्शन केले, असे स्वत: मोहोळ यांनी सांगितले.


मोहोळ यांच्यासमवेत पिट्याभाई

लोकसभा निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीच्या ठराविक उमेदवारांसाठी जाहीर सभा घेतल्या होत्या. त्यामध्ये, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, ठाणे आणि पुणे या ठिकाणी सभा घेत महायुतीच्या उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन केलं होत. पुण्यातील सभेत बोलताना राज ठाकरेंनी पुणे शहराचं वाढतं विस्तारीकरण आणि नागरी समस्यांवर भाष्य करताना पुणे शहराचं व्यवस्थित मॅनेजमेंट आणि सौंदर्यीकरण झालं पाहिजे, अशी भूमिका घेतली. आपल्या भाषणावेळी त्यांनी मुरलीधर मोहोळ यांना जवळ बोलवून त्यांना विजयी करण्याचं आवाहनही पुणेकरांना केलं होतं. त्यानंतर, लोकसभा निवडणुकीत मुरलीधर मोहोळ मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. विशेष म्हणजे पहिल्यांदाच खासदारकीची माळ गळ्यात पडलेल्या मुरलीधर मोहोळ यांना केंद्रातील मोदी ३.० सरकारमध्ये काम करण्याची संधी मिळाली. मोहोळ यांच्या रुपाने पुणेकरांना केंद्रीय राज्यमंत्रीपद मिळालं आहे. केंद्रीय राज्यमंत्रीपद मिळाल्यानंतर आज मुरलीधर मोहोळ यांनी शिवतीर्थ बंगल्यावर जाऊन राज ठाकरेंची भेट घेतली. यावेळी, अभिनेता रमेश परदेशी हाही सोबत होता.

## रमेश परदेशीही ठाकरेंच्या भेटीला

मुळशी पॅटर्नमध्ये पिट्या भाईची भूमिका साकार करणारे अभिनेते रमेश परदेशी हेही मुरलीधर मोहोळ यांच्यासमवेत राज ठाकरेंच्या भेटीला होते. त्यामुळे, फोटो फ्रेममध्ये पिट्याभाईनेही शिवतीर्थवरील राजभेटीत अनेकांचा लक्ष वेधले.

## विधानसभेलाही हेच चित्र दिसेल

लोकसभा निवडणुकीत मनसेने महायुतीला पाठिंबा दिला होता, आता विधानसभेला अजून वेळ आहे. मात्र, विधानसभेतील महायुतीबाबत वरिष्ठ नेत्यांच्या पातळीवर चर्चा होईल, हे सर्व विषय त्यांच्याकडचे आहेत. असं असलं तरी विधानसभेलाही लोकसभेप्रमाणेच चित्र पाहायला मिळेल, असे म्हणत विधानसभेलाही मनसे महायुतीसोबतच राहिले, असे संकेत मोहोळ यांनी दिले आहेत.

# रेल्वे सल्लागार समितीच्या बैठकीत मागण्यांचा पाऊस



पुणे । प्रतिनिधी

पुणे-मुंबईदरम्यान सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजण्याच्या दरम्यान आणखी एक नवीन गाडी सुरू करा, कोल्हापूर अहमदाबाद, जोधपूर एक्स्प्रेसला कराडला थांबे द्या, महालक्ष्मी, हरिप्रिया एक्स्प्रेसचे रेक एलएचबीमध्ये परिवर्तित करा, पुणे-दौंडपर्यंत इलेक्ट्रिक मेमू सेवा सुरू करा, पुणे-बिकानेर एक्स्प्रेसचा कोल्हापूरपर्यंत विस्तार करा, विभागातील सर्व स्थानकांवर पुरेशा संकेत मार्गदर्शक फलक, सीसीटीव्ही बसवा, यांसारख्या विविध समस्या आणि त्या पूर्ण करण्याच्या मागण्यांचा पाऊस शुक्रवारी (दि. २१) विभागीय रेल्वे सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये पडला.

रेल्वेच्या पुणे विभागातील सल्लागार समितीच्या सदस्यांची बैठक शुक्रवारी पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) इंदू दुबे होत्या. या वेळी वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक डॉ. मिलिंद हिरवे यांच्यासह पुणे विभाग सल्लागार समितीचे (डीआरयूसीसी) सदस्य उपस्थित होते. या वेळी सर्व सदस्यांनी पुणे विभागातील स्थानकांवरील पायाभूत समस्यांसह रेल्वेगाड्यांना थांबा देणे, गाड्यांचा विस्तार करणे, नवीन रेल्वेगाडी सुरू करणे, यांसारख्या विविध समस्या आणि मागण्यांचा पाढा वाचला.

तसेच, शेगाव-साईनगर-पंढरपूर डेमू सुरू करा, देहूरोड बेगडेवाडी स्थानकावर प्लॅटफॉर्म उंच करा, लोणंदला शरावती, पद्दुचेरी एक्स्प्रेसला थांबे द्या, कोयना एक्स्प्रेसला जनरल डबे वाढवा, बेलापूर गुड्स शेड स्थलांतरित करा, डेमू गाडीला १४०० एचपीतून १६०० एचपी परिवर्तित करून अतिरिक्त डबे जोडून कोल्हापूर आणि सांगलीकरिता सुरू करणे, लिफ्ट आणि एस्केलेटरची सुविधा, सीसीटीव्ही, सुरक्षा, पार्किंगची समस्या दूर करणे, प्रवासी सुविधा विकसित करणे, रेल्वे परिसर अतिक्रमणमुक्त करणे, यांसारख्या मागण्या सदस्यांनी या वेळी केल्या. त्यासोबतच रेल्वे प्रशासन आमच्या या सर्व मागण्या पूर्ण कधीपर्यंत करणार, असा सवाल सदस्यांकडून उपस्थित झाला.

# पुण्यात पुन्हा कोयता गँगचा धुमाकूळ; पोलिसांच्या गाडीसह १५ ते २० वाहनांची तोडफोड, नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात कोयता गँगला पोलिसांचा धाक उरला नाहीये हे पुन्हा एकदा समोर आलंय. काल सिंहगड रोडवर आता वडगावशेरीच्या गणेशनगर कोयता गँगची दहशत पहायला मिळाली. पुण्यात कोयता टोळीने पोलिसांच्या गाडीसह १५ ते २० वाहनांची तोडफोड केली. पुण्यातील वडगाव शेरी परिसरातील गणेश नगरमध्ये ही घटना घडली. ६ कार, ४ रिक्षा, ३ दुचाकी आणि इतर वाहनांची कोयता गँगने तोडफोड केली. गुंडाने धुमाकूळ घालत कोयते आणि दगडांनी वाहनांची तोडफोड केली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

वडगावशेरीच्या गणेशनगर परिसरात काल कोयता टोळीच्या गुंडाने धुमाकूळ घालत हातामध्ये कोयते आणि दगड घेत वाहनांची तोडफोड करत वाहनांची तोडफोड केल्याने परिसरातील नागरिक भयभीत झाले आहे. सलग पुण्यात दुसऱ्या दिवशी वाहनांची तोडफोड झाल्याने पोलिसांचा धाक उरला की नाही असा सवाल उपस्थित होत आहे. कालच सिंहगड रस्त्यावरील क्रिकेट वाडी या ठिकाणी कोयता टोळीने धुमाकूळ घालत वाहनांची तोडफोड केली होती. त्यानंतर मध्यरात्री चंदननगर परिसरातील



वडगावशेरीत वाहनांची कोयता टोळीने तोडफोड केली आहे..

पुण्यातील किरकटवाडी परिसरात काल संध्याकाळी ७.३० ते ९ च्या दरम्यान दहा ते पंधरा गुंडांनी हवेत कोयते फिरवून आणि दगडफेक करून दहशत माजवण्याचा प्रयत्न केला होता. या टोळक्याने नागरिकांना जखमी करण्याचा प्रयत्न केला असून या घटनेत दगड डोक्याला लागल्याने एकजण गंभीर जखमी झाला आहे. हवेली पोलिसांनी या प्रकरणी नऊ जणांना ताब्यात घेतलं असून यात एका अल्पवयीन मुलाचा देखील समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मुख्य आरोपी आणि इतर सात आरोपींवर कलम ३०७, ३५४,३२३, ३२४, १४३ आणि इतर कलमांतर्गत हवेली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

गेल्या काही दिवसांपासून पुण्यात कोयता गँगचा धुडगूस पाहायला मिळतोय. गेल्या काही महिन्यांपासून गल्ली पासून दिल्लीपर्यंत एकच चर्चा पुण्यातील कोयता गँग. पुणे शहरातील अनेक भागात तरुणांच्या टोळ्या हातात कोयता घेऊन दहशत माजवण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. खंडणी वसूल करणे, धमकावणे, दहशत निर्माण करण्यासाठी शहरातील अनेक भागात हे तरुण हातात कोयते घेऊन फिरताना दिसतायत. यामुळे नागरिकांमध्ये भीती आहेच शिवाय व्यापाऱ्यांमध्ये देखील चिंता आहे.

# विविध संस्थांतर्फे ‘योग दिन’ उत्साहात

पुणे । प्रतिनिधी

विविध संस्था, संघटना, शाळा, फिटनेस क्लबतर्फे शहरात ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला.

शि. प्र. मंडळीच्या नूमवि मुलांच्या प्रशालेचे शाला समिती अध्यक्ष पराग ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिन साजरा झाला. या वेळी मुख्याध्यापक प्रकाश कांबळे, सर्व पर्यवेक्षक, नूमवि प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी योगासने केली. सूत्रसंचालन सुरेश यमगर यांनी केले, तर पर्यवेक्षिका स्मिता कांगुणे आभार मानले.

ल्यूक्रेटीव एक्झिम संस्थेतर्फे कात्रज येथील माऊली गार्डन येथे आयोजित कार्यक्रमात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन योग दिन साजरा केला. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी (आझम कॅम्पस) तर्फे योग दिन उत्साहात साजरा झाला. संस्थेच्या विद्यालयांमधील दोन हजारहून अधिक विद्यार्थी-



विद्यार्थिनींनी योगाचे प्रात्यक्षिके सादर केली. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पी. ए. इनामदार, सचिव प्रा. इरफान शेख, मुख्याध्यापक, शिक्षक आदी उपस्थित होते. आझम स्पोर्ट्स अकादमीचे संचालक डॉ. गुलझार शेख, शबनम पिरजादे, माजीद सय्यद यांनी संयोजन केले.

गुजराती प्राथमिक शाळेत योग शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून विविध योग प्रकार करून घेतले. कोंढव्यातील सूर्यनमस्कार ग्रुपच्या मित्र मंडळांनी शहीद अब्दूल हमीद आयुर्वेदिक गार्डन येथे योग दिन साजरा केला. योगगुरू दादा रणदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासने व प्राणायाम सादर केली. या वेळी हेमराज भोयर, भरत टोणपे, हनुमंत लोणकर, भालचंद्र बाबर, सुरेश दिवेकर, संजय बाबर, राजेंद्र परदेशी आदी उपस्थित होते.

गणेशखिंड येथील मॉडर्न हायस्कूलतर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमात सुदृढ व निरोगी शरीरासाठी योग व प्राणायाम यांचे महत्त्व योग प्रशिक्षक डॉ. प्रज्ञेश नाईकवाडे यांनी विद्यार्थी व शिक्षक यांना सांगितले. विद्यार्थ्यांना विविध योगासनांच्या प्रकारांची प्रात्यक्षिके व त्याचे महत्त्व डॉ. नाईकवाडे यांनी विशद केले. योग प्रशिक्षक निखिलेश भाकरे व कल्याणी खेडकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्या रोहिणी काळे, उपमुख्याध्यापिका वर्षा पाचारणे, पर्यवेक्षिका रेखा खेडेकर, सुनील आडसुळे, दिनेश कुलकर्णी यांनी विशेष प्रयत्न केले. मएसो भावे प्राथमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व सांगून रोज सूर्यनमस्कार घालण्यास सांगितले. विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, अर्धचक्रासन, भुजंगासन, पद्मासन अशी विविध आसने सादर केली.

जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि मॅनेजमेंट पुणे येथे योग शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराची सुरुवात योगगुरू गिनेस बाजड आणि रायसोनी कॉलेजचे कॅम्पस संचालक डॉ. आर. डी. खराडकर यांच्या हस्ते झाली. जागृती महिला व बालकल्याण संस्थेच्यावतीने सिंहगड रस्ता येथील पालिकेच्या जगताप शाळेत विद्यार्थ्यांनी योगासने सादर केली. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा टल्लू यांनी केले.

# शरद पवारांची विधानसभेसाठी खलबते; नवनिर्वाचित खासदारांसोबत चार तास बैठक

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीमध्ये दहापैकी आठ उमेदवार निवडून आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पक्षाध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवारी (दि.२१) नवनिर्वाचित खासदार व प्रमुख आमदारांसह तब्बल चार तास बैठक घेऊन निवडणुकीसंदर्भात खलबते केली.

मार्केट यार्डमधील निसर्ग मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, नवनिर्वाचित खासदार डॉ. अमोल कोल्हे, धैर्यशील मोहिते पाटील, नीलेश लंके, बजरंग सोनवणे, अमर काळे, भास्कर भगरे, आमदार रोहित पवार आदींसह काही माजी आमदार उपस्थित होते. भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे ऊर्फ बाळ्या मामा हे आरोग्याच्या कारणामुळे अनुपस्थित होते.

महाविकास आघाडीतील महत्त्वाचा घटक



असतानाही शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपात जास्त काही न ताणता केवळ दहा जागा घेतल्या आणि झंझावाती प्रचार करत दहापैकी आठ जागा निवडून आणल्या. सातार्‍याची जागा कमी मताने पराभूत झाली. इतर पक्षांच्या तुलनेत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा स्ट्राईक रेट सर्वाधिक असल्याने आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाचा जास्त जागांचा आग्रह महाविकास आघाडीमध्ये राहणार आहे. या अनुषंगाने शरद पवार यांनी शुक्रवारी बैठक घेऊन तब्बल चार तास निवडणूक व इतर विषयांवर चर्चा केली.

# अजित पवारांच्या वर्चस्वाला अखेरचा सुरुंग लावण्याचे शरद पवारांचे मनसुबे

पुणे । प्रतिनिधी

अजित पवारांच्या वर्चस्वाला अखेरचा सुरुंग लावण्याचे शरद पवारांचे मनसुबे लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी १ लाख ५८ हजार मतांच्या फरकाने विजय मिळविला. या निवडणुकीत बारामती विधानसभा मतदारसंघाने सुळे यांना ४८ हजार मतांची आघाडी दिली. आता या आघाडीच्या जोरावरच विधानसभेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीतील वर्चस्वाला अखेरचा सुरुंग लावण्याचे काम ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांनी मतदारांचे आभार मानण्यासाठी तीन दिवस बारामती तालुक्याचा दौरा करून सुरू केल्याचे दिसते. ठिकठिकाणी सभा घेत, शेतकर्‍यांशी संवाद साधत, जुन्या सहकार्‍यांच्या घरी भेट देत शरद पवार यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीनेच पेरणी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

काका विरूद्ध पुतण्या

नुकतीच पार पडलेली बारामती लोकसभेची निवडणूक लक्षवेधी ठरली. या निवडणुकीची सारी सूत्रे शरद पवार




यांनीच हाती घेतली होती. त्यामुळे निवडणूक ‘सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार’ यांच्यात झाली असली, तरी ती प्रत्यक्षात शरद पवार व अजित पवार या काका-पुतण्यातच होती. त्यात राजकारणातील महावस्ताद समजल्या जाणार्‍या शरद पवार यांनी पुतण्याला गुगली टाकून क्लीन बोल्ड केले. ज्या बारामती विधानसभा मतदारसंघातून मोठे मताधिक्क्य मिळेल, अशी अजित पवारांना अपेक्षा होती, त्या मतदारसंघानेच त्यांच्याविरोधात कौल दिला.

बारामतीत शरद पवार’च’!

लोकसभा निवडणुकीतील सुळे यांच्या विजयाच्या चौकारामुळे शरद पवार गोटात अतिशय उत्साह संचारला आहे. त्यावर स्वार होत शरद पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघात व्यापक जनसंपर्क अभियान राबविले. पहिल्या टप्प्यात दुष्काळी भागाचा दौरा केला. नंतर बारामतीतील व्यापारी व वकिलांचा मेळावा घेतला. त्यानंतर तीन दिवस बारामती तालुक्याचा दौरा केला. या दौर्‍यात राजकीय दृष्ट्या प्रभावी समजल्या जाणार्‍या गावांत त्यांनी सभा घेतल्या तसेच शेतकर्‍यांच्या समस्या जाणून घेत त्यावर उपाययोजना करण्याची ग्वाही दिली. जुन्या मित्रांच्या आठवणींना उजाळा देत काहींच्या घरी आवर्जून भेट दिली. या माध्यमातून त्यांनी जनमानसावरील आपली पकड अधिकच घट्ट करण्याचा प्रयत्न केला.

लोकसभा झाली, आता विधानसभा

या दौर्‍यात त्यांनी घेतलेल्या सभांमध्ये, कोणते बटन दाबायचे ते बारामतीतील मतदारांना सांगावे लागत नाही. लोकसभेला जे केले, तेच विधानसभेला करा. गेली ५६ वर्षे जशी साथ दिली, तशीच यापुढेही द्या, असे सांगत आगामी विधानसभा निवडणुकीतील आपले मनसुबे स्पष्ट केले. याबरोबरच बारामती विधानसभेतील संभाव्य उमदेवारालाही त्यांनी प्रोजेक्ट केले. लोकसभा निवडणुकीत जेवढे फिरले नव्हते त्यापेक्षाही अधिक ते आभार दौर्‍यानिमित्त तालुक्यात फिरले. याद्वारे त्यांनी चार महिन्यांनी होणार्‍या विधानसभा निवडणुकीतील प्रचारच एकप्रकारे केल्याचे मानले जात आहे. या माध्यमातून त्यांनी अजित पवार यांना थेट इशाराच दिला असल्याचे दिसते.

# सेल्समननेच चोरले सहा लाखांचे दागिने

पुणे । प्रतिनिधी

सराफी दुकानातील सेल्समननेच दुकानातील तब्बल पाच लाख ८६ हजार रुपये किमतीचे दागिने चोरल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी चोरी करून पसार झालेल्या सेल्समनला तत्काळ अटक करून त्याच्याकडून चोरलेला मुद्देमाल जप्त केला. ही घटना कात्रजजवळील दत्तनगर परिसरात घडली.

विवेक वसंत दाभोळकर (रा. जाधवनगर, धायरी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी राहुल प्रकाश क्षीरसागर (वय ४३, रा. आंबेगाव खुर्द) यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावरून दाभोळकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी क्षीरसागर यांचे दत्तनगर येथील जांभूळवाडी रस्त्यावर आकांक्षा ज्वेलर्स नावाचे सराफी दुकान आहे. त्यांच्या दुकानात दाभोळकर हा काही वर्षांपासून सेल्समन म्हणून नोकरीस होता. १६ मे रोजी सायंकाळी पावणेपाच वाजता दाभोळकर याने दुकानातील ९७ ग्रॅम वजनाच्या बांगड्या, गंठण, मंगळसूत्र, मणी आदी पाच लाख ८६ हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले. दुकानातील दागिने चोरीला गेल्याचे फिर्यादीच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तत्काळ भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. दरम्यान, घटनास्थळी वरिष्ठ पोलिस निरीक्षक दशरथ पाटील, पोलिस निरीक्षक शरद झिने (गुन्हे), पोलिस उपनिरीक्षक धीरज गुप्ता यांनी भेट दिली. गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने काही दिवसातच आरोपीचा शोध घेऊन त्यास अटक केली. त्याच्याकडील पाच लाख ८६ हजार रुपये किमतीचे दागिने जप्त केले.

## पुणे- मुंबई दरम्यान धावणाऱ्या ’या’ एक्सप्रेस गाड्या २८ ते ३० जूनपर्यंत रद्द

पुणे । प्रतिनिधी

पुणतांबा कानेगाव आणि दौंड मनमाड विभागात सुरू असलेल्या दुहेरीकरणाच्या कामामुळे पुणे-मुंबई-पुणे दरम्यान धावणारी इंटरसिटी एक्स्प्रेस आणि डेक्कन एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. या एक्सप्रेस गाड्या २८ जून ते ३० जूनपर्यंत रद्द करण्यात येणार आहेत.

शुक्रवार २८ जूनला पुणे-मुंबई इंटरसिटी/एक्सप्रेस रद्द राहणार आहे. शनिवारी २९ जूनला मुंबई-पुणे डेक्कन एक्सप्रेस रद्द करण्यात येणार आहे. तर त्याच दिवशी पुणे मुंबई इंटरसिटी सुद्धा रद्द राहणार आहे. तसेच, रविवारी ३० जून रोजी मुंबई-पुणे इंटरसिटी रद्द राहणार आहे. त्यामुळे रेल्वे प्रवाशांना या तीन दिवशी पुणे मुंबई प्रवासासाठी कसरत करावी लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# मधमाश्यांच्या हल्ल्यात वडील व मुलगा जखमी

मंचर : आदर्शगाव कुरवंडी (ता. आंबेगाव) येथे शुक्रवारी (ता. २१) संध्याकाळी शेतात बटाटा लागवड करत असताना आग्या मोहोळ मधमाश्यांनी केलेल्या हल्ल्यात वडील व मुलगा गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर अनुक्रमे खासगी व मंचर उपजिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. बबन मारुती तोत्रे (वय ६५) व त्यांचा मुलगा दीपक बबन तोत्रे (वय ४०), अशी मधमाश्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांची नावे आहेत.

शेतकरी रवींद्र तोत्रे व बबन तोत्रे यांच्या शेतजमिनीत बटाटा लागवडीचे काम ट्रॅक्टरच्या सहाय्याने दीपक तोत्रे, सुदर्शन तोत्रे, धनेश तोत्रे, विशाल तोत्रे हे करत होते. संध्याकाळी त्यांच्याजवळ आग्या मोहोळाच्या माशा आल्या. काही क्षणातच १५० ते २०० माशा डंख मारू लागल्या. त्यामुळे सर्वजण पळत सुटले. पण, बबन तोत्रे व दीपक तोत्रे यांचा पाठलाग करून मधमाश्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. त्यामुळे मधमाशांपासून बचावासाठी शेताच्या बाजूलाच असलेल्या पाण्याच्या डबक्यात उडी मारून डोक्यावर प्लॅस्टिकची पिशवी बांधली. अर्धा तास डबक्यात थांबून राहिल्यानंतर व अंधार पडल्याने माशा तेथून निघून गेल्या. हल्ल्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. सत्यवान तोत्रे, सोमनाथ तोत्रे व रवींद्र तोत्रे यांनी दोघांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या बबन तोत्रे यांच्यावर मंचर येथे खासगी रुग्णालयात व दीपक तोत्रे यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत कोंढापुरीत वानराचा मृत्यू

तळेगाव ढमढेरे । प्रतिनिधी

कोंढापुरी (ता. शिरूर) येथे पुणे-नगर महामार्गावर शनिवारी (ता. २२) पहाटेच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेत वानराचा मृत्यू झाला.

कोंढापुरी येथे पुणे- नगर महामार्गावर शनिवारी पहाटेच्या सुमारास एका वानराला वाहनाची धडक बसली. त्यात वानर ठार झाल्याचे काही नागरिकांना दिसले. याबाबतची माहिती शिरूर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांना मिळताच वनपाल गौरी हिंगणे, वनविभाग रेस्क्यू टीमचे सदस्य शेरखान शेख व अमोल कुसाळकर यांनी पाहणी केली असता अंदाजे पाच वर्षे नर जातीच्या वानराचा वाहनाच्या धडकेने मृत्यू झाल्याचे दिसले. यावेळी वनविभाग अधिकारी व प्राणी मित्रांनी मृत वानराचा पंचनामा करून वानराच्या मृतदेहाचे शासकीय जागेत दहन केले.